## आंदोलकांना मदत करा - अमित ठाकरे

मुंबई, दि. १ प्रतिनिधी

मुंबईत मराठा आरक्षणासाठी राज्यभरातून आलेल्या मराठा बांधवांच्या आंदोलनाला पाठिंबा देताना, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, आंदोलक हे शेतकरी, मजूर, आणि शिक्षणासाठी धडपडणारे युवक आहेत, म्हणजेच आपले सख्खे बांधव. त्यांनी कार्यकर्त्यांना आंदोलकांना अन्न-पाणी, औषधोपचार, राहण्याची सोय आणि सुरक्षितता यांची काळजी घेण्याचे निर्देश दिले. कोणताही मराठा बांधव मुंबईत एकटा वाटू नये, अशी भावना व्यक्त करत त्यांनी सर्वांना आंदोलकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.


गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | मंगळवार, २ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९१ | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## अग्रलेख
### खरीखरी

## गंभीरपणे विचार करावा !

मुंबई शहर हे मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्राचे निर्माण होण्या पूर्वीपासून आंदोलनाचे शहर राहिले आहे. या शहरात दादाभाई नवरोजी काय, लोकमान्य टिळक काय, महात्मा गांधी गाय किंवा कॉ. डांगे यांच्यापासून जॉर्ज फर्नांडिस यांच्यापर्यंत प्रत्येकाची आंदोलन करण्याची एक वेगळी पद्धत होती. त्या काळात नेत्याने आवाहन केले की आंदोलक त्यांचा शब्द आणि आज्ञा प्रमाण मानत असत. मिल मजदूरांच्या बोनसच्या आंदोलनाचे दृश्य आणि वार्तांकन आम्ही केलेले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आचार्य अत्रे यांच्या शब्दात म्हटले तर, नरराक्षस मोरारजी देसाई यांनी चक्क गोळीबाराचा आदेश दिला होता. त्यामधील हुतात्म्यांचे आज हुतात्मा चौकात स्मारक शिवसेना सत्तेवर असताना उभे झालेले आहे. मुंबईत होणाऱ्या आंदोलनाला एक दिशा असते त्यामुळे मुंबईची झालेली दशा आजपर्यंत दिसली नाही. आताचे आंदोलन वेगळ्या प्रकारचे आहे, केवळ समाजाच्या हितासाठी आपल्या जीवाची बाजी लावून मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत पदार्पण केले. कालपासून त्यांनी पाणीही बंद केले आहे कारण जरांगे पाटील यांच्या मनात मराठा समाजाविषयी तळमळ आहे, म्हणूनच ते इतका आत्मक्लेश करून घेत आहेत. स्वतः या आंदोलनाचे सर्वोच्च नेते जरांगे पाटील हे केवळ हवेवर जगत आहे आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जरांगे पाटील यांच्या एका आवाहनामुळे मराठा समाजाचे जथ्थेच्या जथ्थे मुंबईत दाखल झालेले आहेत. आजच्या घडीला तरी या आंदोलकांना आंदोलनाची दिशा दाखवणारा सर्वमान्य नेता दुसरा कोणीही दिसत नाही,त्यामुळे मुंबईची दशा होऊ नये म्हणूनच आंदोलकांना आणि त्यांच्या नेत्यांना संयम दाखवावा लागेल. बळजबरी करणे किंवा पोलीस कारवाई करणे या क्षणाला अशक्य आहे. यापुढेही दादा-बाबा करूनच हे आंदोलन थोपवावे लागणार आहे. आजच काही आंदोलकांनी शेअर बाजारकडे आपला मोर्चा वळवला होता पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असल्यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही, पण त्यासाठी पोलिसांना किती आटापिटा करावा लागला असेल याची कल्पनाच केलेली बरी. जरांगे पाटील यांच्या मागण्या निश्चितपणे योग्यच आहेत असे म्हटले तरी त्याला कायद्यात बसवणे तितकेही सोपे नाही. आता तर आंदोलकांच्या अपेक्षांची वेल गगनापर्यंत गेलेली आहे, याला अनेक कंगोरे आहेत. आंदोलकांच्या अपेक्षा कितीही योग्य असल्या तरी सरकारला निश्चितपणे अनेक मर्यादा असतात. परस्पर विरोधी असलेल्या सरकारांनी एकमेकांवर आरोप करणे सोपे असते मात्र, प्रत्यक्षात सत्तेवर असणाऱ्यांची यामध्ये प्रचंड मोठी गोची होते. केवळ आपल्याच राज्यात असे प्रश्न नाहीत. तर देशातील अनेक मोठमोठे प्रश्न असेच अनुत्तरीत आहेत अगदी त्रिशंकू झालेले आहेत आणि लटकत पडलेले आहेत. सध्याच्या घडीला मराठा सेवक मनोज जरांगे पाटील यांचा जीव जास्त महत्त्वाचा आहे त्यांनी असिधारा व्रत स्वीकारलेले आहे. एक अत्यंत कमी वजन असणारा माणूस राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या किती वजनदार ठरू शकतो याचे उदाहरण म्हणजे जरांगे पाटील आहेत. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना कितीही दूषणे दिली तरी शेवटी त्यांनाच या प्रश्नाचा निकाल लावावा लागेल. हे सुद्धा आंदोलन करणाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे कारण अशा प्रकारच्या आंदोलनामध्ये सर्वांनाच प्रसन्न करणे शक्य नसते. थोडे तुम्ही पुढे या आणि आम्ही थोडेसे मागे जातो असे करावेच लागते. जरांगे पाटील यांना निश्चित असे आश्वासन देऊन हे आंदोलन लवकरात लवकर थांबविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यात आता जास्त दिवस आणि वेळ न घालवता प्रत्येक तासा-तासांमध्ये तोडगा शोधणे हेच आता कौशल्याचे काम आहे. जरांगे पाटील यांना नक्कीच ठोस आश्वासन दिल्याशिवाय आंदोलनाच्या गाडीचा जो काही चक्काजाम झालेला आहे तो थांबेल असे दिसत नाही. सरकारने आणि मराठा आंदोलनाच्या नेत्यांनीही या सर्वांचा गंभीरपणे विचार करावा.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# आंदोलन हाताबाहेर गेले आहे - उच्च न्यायालय

## नवी मुंबई-ठाण्यातून येणाऱ्या लोकांना थांबवा

मुंबई, दि. १ प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचा वाद आता न्यायालयात पोहोचला असून ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी आझाद मैदानात सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मनोज जरांगे पाटील आणि वीरेंद्र पाटील यांनी आदेशाचं उल्लंघन केल्याचा दावा याचिकाकर्त्यांनं कोर्टात केला आहे. आंदोलकांकडून देखील आज उच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली असून कैलास खांडबहाले यांच्याकडून हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यापुढे परवानगी मिळणार की नाही हे पाहावे लागेल. दरम्यान, हायकोर्टाने काही महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले असून मुंबईतील मराठा आंदोलन हाताबाहेर गेलं आहे, आता कोणालाही मुंबईत येऊ देऊ नका, असे निर्देशच न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

मुंबईत संपूर्ण उच्च न्यायालय परिसराला घेराव घालण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या गाड्या अडवण्यात आल्या आहेत, त्यांना उच्च न्यायालयात येण्यापासून अडवण्यात आल्याचं न्यायमूर्तींकडून स्वतः सांगण्यात आलं. तसेच, मुंबईत अजून आंदोलनकर्ते येत आहेत, त्यांना कसं अडवणार अशी विचारणाही मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे. न्यायालयाने आजच्या सुनावणी राज्य सरकारला चांगलंच सुनावलं. दरम्यान, सुनावणीदरम्यान हायकोर्टाच्या बाहेर मराठा आंदोलक अनेक ठिकाणी उभे असल्याचं पाहायला मिळालं.

एमी फाऊंडेशनने दाखल केलेल्या याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले होते. मात्र, त्या आदेशाच उल्लंघन झाल्याचं याचिकाकर्त्यांकडून कोर्टाला सांगण्यात आलं. मनोज जरांगे पाटील आणि वीरेंद्र पाटील यांनी आदेशाचं उल्लंघन केल्याचा दावा याचिकाकर्त्यांनं कोर्टात केला आहे. तर, आंदोलकांनी मुंबई अडवून ठेवली असल्याचा दावा ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी कोर्टात केला आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी श्रीकांत अडाते



हेही उच्च न्यायालयात उपस्थित होते. दरम्यान, आंदोलकांकडून देखील आज उच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली असून कैलास खांडबहाले यांच्याकडून हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली आहे.

### हायकोर्टाची सरकारला विचारणा

मुंबई उच्च न्यायालयाने न्यायालयात मनोज जरांगे पाटील यांचा अर्ज वाचून दाखवला. या अर्जाच्या सुरुवातीलाच आमरण उपोषणाचा उल्लेख आहे. मात्र, नियमात आमरण उपोषणाला परवानगी नसल्याने उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारणा केली आहे. अर्जाच्या खाली जरांगे पाटील यांची सही असल्याचं तुम्ही सांगू शकता का? मनोज जरांगे पाटील यांना नोटीस बजावण्यात आली आहे का? अशीही विचारणा मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे. गेल्या सुनावणीत नोटीस बजावण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते.

### आंदोलकांकडून नियम व अटींचे उल्लंघन

केवळ आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी देण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांने केला आहे. तसेच, दुसरीकडे आंदोलन करण्यास परवानगी नाही, परवानगी फक्त एका दिवसासाठी देण्यात आली होती, अशी बाजू राज्य सरकारने मांडली. आंदोलकांकडून लिहून देताना सगळ्या अटी पाळण्यात येतील असं मान्य केलं होतं, त्याआधारे परवानगी देण्यात आली होती अशी माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयात दिली. कोर्टाने नियमात राहून आंदोलन करण्याची परवानगी दिली होती, त्यानुसार परवानगी देण्यात आली होती. आझाद मैदान हे आंदोलनासाठी आरक्षित आहे. मात्र, त्याव्यतिरिक्त कुठेही आंदोलन



करण्यास परवानगी नाही, असेही सरकारने म्हटले आहे.

### राज्य सरकार काय म्हणाले?

गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणं पोलिसांसाठी देखील कठीण आहे. तरी आम्ही समतोल पाळण्याचा प्रयत्न करतोय जेणेकरून कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही. शनिवारी आणि रविवारी आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, केवळ 5 हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. राज्य सरकारने दिलेल्या परवानगीवर याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे. तसेच, ध्वनिक्षेपकांच्या वापरला विनापरवाना वापरण्यास परवानगी दिली नाही, आंदोलनाला केवळ सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच परवानगी देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी अटी शर्ती पाळून परवानगी मागितली होती, म्हणून त्यांना परवानगी देण्यात आली होती. त्यातही, ५००० लोकांचा जमाव असेल आणि १५०० वाहन असतील, असे सांगण्यात आले होते. तुम्ही सगळ्या नियमांच उल्लंघन केल्याचं राज्य सरकारने वेळो-वेळी जरांगे पाटील यांना सांगितलं. बैलगाड्या चावल्या जात आहेत, शहर एक खेळाचं मैदान झालं आहे, अशी माहिती राज्य सरकारने दिली. आंदोलक सगळीकडे आहेत, फ्लोरा फाऊंटनमध्ये आहेत, सीएसएमटी स्थानकात आंदोलक आहेत, असे म्हणत राज्य सरकारकडून उच्च न्यायालयात फोटोही दाखवण्यातआले. त्यामुळे, याचा काय तोडगा काढणार अशी विचारणा उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली होती. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयात देखील आंदोलनकर्त्यांचा आवाज ऐकू येऊ लागल्याने उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केलं.

### मुंबईकरांना त्रास होईल असे वागू नका, मैदानात गाड्या लावा- जरांगे पाटील

न्यायालयाने मंगळवारपर्यंत रस्ते मोकळे करा असे आदेश दिल्यानंतर आता मनोज जरांगे यांनीही आंदोलकांना आवाहन केलं आहे. मुंबईकरांना त्रास होईल असं वागू नका, कुणाचं ऐकून गोंधळ घालू नका असं आवाहन जरांगे यांनी केलं. मुंबईच्या रस्त्यांवर असलेल्या गाड्या आझाद मैदानाच्या बाजूच्या क्रॉस मैदानात लावा, तिथेच झोपा असंही जरांगे म्हणाले. जर कुणी ऐकणार नाही तर त्याने गावाकडे परत जावं, कुणाच्या आदेशावर हुल्लडबाजी करणाऱ्यांना स्थान नाही. मी शेवटचं सांगतोय, आंदोलनाला बदनाम करू नका अन्यथा सोडणार नाही असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामध्ये काही ठिकाणी हुल्लडबाजी होत आहे, न्यायालयाच्या निर्देशांचे पालन होत नाही असा आरोप एका याचिकेद्वारे न्यायालयात करण्यात आला. त्यावर मंगळवारी दुपारीपर्यंत मुंबईतील सर्व रस्ते रिकामे करा असे निर्देश न्यायालयाने दिले. त्यानंतर मनोज जरांगे यांनीही तशाच प्रकारचं आवाहन केलं.

### पोलिसांनी कारवाई केली नाही - सदावर्ते

मुंबईतील मराठा आंदोलनाबाबत मी २९ तारखेला तक्रार दिली, आझाद मैदानाच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना फोन केला आणि त्यांना परिस्थिती जाणीव करून दिली. लेखी तक्रार दिली आणि गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज केला. पण, पोलिसांनी कारवाई केली नाही, असे गुणरत्न सदावर्त यांनी न्यायालयात म्हटले. तसेच, आज राज्याचा मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून हे सुरू आहे, असेही सदावर्तेंनी म्हटलं.

### उच्च न्यायालयाचे निरिक्षण


- आम्हाला जरांगे पाटील यांच्या तब्बेतीची काळजी आहोत
- आम्ही आज देखील त्यांना वैद्यकीय उपचार घेण्यास सांगू शकतो
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकांनी गच्च भरलं आहे.
- आंदोलनकर्ते रस्त्यावर शौचालय करत आहेत.
- फ्लोरा फाऊंटनमध्ये अंघोळ करत आहेत.
- मुंबई उच्च न्यायालयाने आंदोलनकर्त्यांच्या समर्थनात वकिलांना खडसावले.
- सध्या मुंबईत पाऊस आहे हवामान खात्याचा अलर्ट आहे गणपती आहेत तुम्हाला हे सगळ माहिती होते.
- आता तुम्ही मैदानात चिखल आहे अशी तक्रार करू शकत नाही उच्च न्यायालयाने केलं स्पष्ट..
- तुम्ही मुंबई थांबवू शकत नाही रस्ते अडवू शकत नाही मुंबईची दिनचर्या थांबवू शकत नाही आणि हेच सगळ सुरू आहे.
- उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन होईल या दृष्टीने राज्य सरकारने पावलं उचलावीत.
- सगळं पूर्ववत आंदोलनकर्त्यांना दोन दिवसांचा अवधी देऊ
- उद्या आदेशाच पालन झालं की नाही ते राज्य सरकारला कोर्टात सांगाव लागणार.
- सीएसएमटी, मरीन ड्राईव्ह, फ्लोरा फाउंटेन आणि दक्षिण मुंबईतील इतर परिसरातून आंदोलकांना हटवण्याचे उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश
- आमरण उपोषण करण्यास परवानगी नव्हती असेही न्यायालयाने स्पष्ट केले.
- आम्हाला काही फोटो आणि व्हिडिओ दाखवण्यात आले ज्याने स्पष्ट होतंय की मुंबईचे रस्ते अडवण्यात आले आहेत.
- मुंबईतले रस्ते आंदोलनकर्त्यांनी तुडुंब भरले आहेत.
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मरीन ड्राईव्ह सगळं आंदोलनकर्त्यांनी भरलं आहे.
- रस्त्यावर नाच सुरू आहे ते रस्त्यावर अंघोळ करत आहेत खेळ खेळत आहेत.
- आंदोलनकर्त्यांच्या वकिलांना देखील परिस्थिती गंभीर असल्याचं मान्य असून शहर थांबलं आहे, हे देखील त्यांना मान्य आहे.
- केवळ निश्चित करण्यात आलेल्या आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी आहे.
- केवळ नऊ ते सहा पर्यंत परवानगी होती आणि त्यानंतर खाली करणे बंधनकारक होतं.
- आमरण उपोषण करण्यास परवानगी नव्हती.

# मराठा आरक्षणप्रश्नी लवकरच मसुद्याला अंतिम स्वरुप मिळणार - विखे पाटील

मुंबई, दि. १ प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारकडून वेगवान हालचाली सुरू आहेत. सोमवारी आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं की, "हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याबाबतचा मसुदा लवकरच अंतिम करण्यात येईल. यासाठी विधितज्ज्ञ आणि महाधिवक्त्यांसोबत सविस्तर चर्चा सुरू असून, न्यायालयीन कसोटीवर टिकणारा निर्णय घेण्यावर भर देण्यात येत आहे. मात्र, मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेमुळं प्रक्रियेला थोडा विलंब झाला आहे."

दरम्यान, मराठा समाजाच्या आरक्षण मागणीसाठी मनोज जरांगे



पाटील यांनी पुकारलेल्या आंदोलनानं तीव्र स्वरुप धारण केल्यानंतर, राज्य सरकारनं या प्रकरणी सक्रिय पावले उचलली आहेत. आज मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलकांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी विविध पर्यायांचा विचार करण्यात आला. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी सविस्तर माहिती दिली.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं की, "आंदोलकांनी केलेल्या मागण्यांबाबत गेल्या दोन दिवसांपासून वेगवेगळ्या विधितज्ज्ञांशी चर्चा करीत आहोत. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी न्या. संदीप शिंदे आणि आमचे अधिकारी आंदोलनस्थळी जाऊन आले. त्यांचं निवेदनही प्राप्त झालं आहे. राज्याच्या महाधिवक्त्यांसोबत चर्चा झाली असून, आवश्यक ती माहिती उपलब्ध करून घेत आहोत. आज सकाळी झालेल्या बैठकीत स्वतः मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित होते. याशिवाय महाधिवक्ता आणि न्या. संदीप शिंदे देखील हजर होते.

दरम्यान, बैठकीचा मुख्य फोकस हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीवर होता. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्पष्ट केलं की, "सध्याच्या कायद्याच्या चौकटीत राहून हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी कशी करता येईल, याबाबत सविस्तर चर्चा झाली. कारण, आंदोलकांसमोर आम्ही सरकार म्हणून जी भूमिका मांडू, ती न्यायालयातही टिकली पाहिजे. मात्र, मुंबई उच्च न्यायालयात आज एक जनहित याचिका दाखल झाल्यामुळं महाधिवक्त्यांना तिथं जावं लागलं. न्यायालयानं या याचिकेच्या सुनावणीदरम्यान काय निर्देश दिले आहेत, हे पाहिल्यानंतर पुन्हा महाधिवक्त्यांसोबत बैठक होईल. त्यानंतरच प्रारूप मसुद्याला अंतिम स्वरूप देता येईल."

**सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा अभ्यास सुरू :** राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं की, सर्वोच्च न्यायालयाच्या काही निकालांचा अभ्यास सध्या सुरू आहे. या निकालांमध्ये सरसकट आरक्षण देता येत नाही, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. परंतु, आंदोलकांच्या मुख्य मागणीप्रमाणे मराठवाड्यातील जनतेसाठी हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत आम्ही एक मसुदा तयार केला आहे. हा मसुदा कायद्याच्या कसोटीवर उतरावा म्हणून तो महाधिवक्त्यांनी तपासावा, अशी अपेक्षा आहे. आज या मसुद्याबाबत बैठक घेणार होतो, पण जनहित याचिकेवर तातडीने सुनावणी लागल्यामुळे त्यास विलंब झाला. तरीही आजच या प्रारूपाचे काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे."

**मनोज जरांगेंना भेटण्याची शक्यता कमी :** मसुदा अंतिम झाल्यानंतर तो मनोज जरांगे पाटील यांना थेट द्यायचा की नाही, याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. दरम्यान, "वेगवेगळ्या पर्यायांवर चर्चा झाली. काही निर्णयांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचे बंधन आहे, ते झुगारून त्यापुढे जाता येणार नाही. परंतु, गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत तोडगा काढता येईल, असं आमचं मत आहे. तो मसुदा अंतिम झाला की, तो आपल्यासमोर ठेवू", असंही राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितलं.

### मंत्रालय परिसरात कडेकोट बंदोबस्त

मराठा आंदोलकांनी मंत्रालय परिसरात आंदोलन सुरू करू नये, यासाठी प्रशासनाने खबरदारी घेतली आहे. मंत्रालयासमोरील मादाम कामा रोड, हुतात्मा चौक आणि सीएसएमटी स्टेशनकडे जाणारे सर्व प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. या परिसरात चौतर्फा बॅरीकेडिंग करण्यात आले असून, पायी जाणाऱ्या व्यक्तींची ओळखपत्रे तपासूनच पुढे सोडले जात आहे. मंत्र्यांच्या बंगल्यांभोवतीही अतिरिक्त सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) आणि द्रुत कृती दल (रॅपिड ॲक्शन फोर्स) यांच्या जवानांची मोठी



तुकडी आझाद मैदान आणि आसपासच्या परिसरात तैनात आहे. मुंबई पोलिसांनी २ हजारांहून अधिक कर्मचारी सुरक्षा व्यवस्थेसाठी तैनात केले आहेत.

### वाहतूक कोंडी आणि पर्यायी मार्ग

आंदोलकांची वाढती गर्दी आणि रस्त्यांवरील निदर्शनांमुळे मुंबईत ठिकठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. विशेषतः सीएसएमटी, क्रॉफर्ड मार्केट, पूर्व मुक्त मार्ग आणि पूर्व द्रुतगती मार्गावर वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या आहेत. मुंबई पोलिसांनी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अनेक मार्ग वळवले असून, पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जरांगेंची प्रकृती खालावली

मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून आझाद मैदानात सुरू केलेले उपोषण आता अधिक तीव्र केले आहे. त्यांनी पाणी घेणेही बंद केले असून, यामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. आंदोलनस्थळी डॉक्टरांचे एक पथक दाखल झाले असून, त्यांनी जरांगे यांना उपचार घेण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, "जोपर्यंत मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत मी उपोषण सोडणार नाही," अशी ठाम भूमिका जरांगे यांनी घेतली आहे. त्यांनी सरकारवर टीका करताना म्हटले, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फक्त राजकारण करायचे आहे. आम्हाला राजकारण नको, फक्त आरक्षण हवे आहे."

# गेटवे परिसरातील प्रवासी जेट्टी प्रकल्पाला सर्वोच्च न्यायालयाचा हिरवा झेंडा

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

राजधानी मुंबईत येणाऱ्या पर्यटकांसाठी आणि मुंबईची आर्थिक उलाढाल अधिक गतीमान करण्यासाठी येथील गेटवे ऑफ इंडिया शेजारी उभारण्यात येणाऱ्या प्रवासी जेट्टी प्रकल्पाविरोधातील सर्व याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे, या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. भारताचे मुख्य न्यायाधीश बी.आर.गवई आणि न्यायमूर्ती के.विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने याचिकाकर्ते व महाराष्ट्र सागरी मंडळ या दोन्ही बाजूंची सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर निर्णय सुनावला. त्यामुळे तब्बल रु. 229 कोटींच्या या जेट्टी प्रकल्पाचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

मंत्री नितेश राणे आणि महायुती सरकारच्या या महत्वकांक्षी जेट्टी प्रकल्पामुळे मुंबईकरांना समुद्री प्रवासासाठी आधुनिक, सुरक्षित आणि जलद सुविधा मिळणार आहेत. टर्मिनलमध्ये प्रतीक्षालय, तिकीट काउंटर, प्रशासकीय कार्यालये, तसेच पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यमान जेट्टी टप्प्याटप्प्याने बंद करून त्याठिकाणी नवीन जेट्टी कार्यान्वित केली जाणार आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर गेटवे परिसरातील जलवाहतूक क्षेत्र अधिक बळकट होऊन सागरी प्रवासाला चालना मिळेल. शिवाय मुंबईकरांना गर्दी व वाहतूक कोंडीत दिलासा मिळून प्रवाशांना आधुनिक टर्मिनल, सोयीस्कर प्रतीक्षालय आणि सुरक्षित प्रवासाचा नवा अनुभव मिळणार आहे.

गेटवे परिसरातील रेडिओ जेट्टीविरोधात याचिकाकर्त्यांकडून विविध आक्षेप घेण्यात आले होते. ह्या प्रकल्पाचा परिसरातील नागरिकांना फायदा नसल्यामुळे आणि हा मोठा प्रकल्प असल्यामुळे गेटवे वस्तूला त्याची बाधा पोहोचेल असेही याचिकेत म्हटले होते. परंतु महाराष्ट्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की हा प्रकल्प फक्त काही रहिवाश्यांसाठी नसून, संपूर्ण मुंबईकरांसाठी आहे. मुख्य न्यायाधीश श्री.गवई यांनीही नमूद केले की "मुंबई ही फक्त ताज हॉटेल परिसरापुरती मर्यादित नसून ठाणे, डोंबिवली व आसपासच्या नागरिकांनादेखील ह्या जेट्टीचा वापर करता येणार आहे." याचिकाकर्ते आणि महाराष्ट्र सागरी मंडळ अशा दोन्ही बाजूंची सुनावणी घेतल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने जेट्टी विरोधातील सर्व याचिका फेटाळण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

# कोर्टाच्या आदेशाचे पालन करणार- मुख्यमंत्री

मुंबई, दि. १ प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सध्या सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत हायकोर्टात आज सुनावणी झाली. हायकोर्टाने उद्या दुपारी ४ वाजेपर्यंत आझाद मैदान वगळता, इतर सर्व ठिकाणाहून मराठा आंदोलकांना हटवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, आंदोलकांच्या वर्तणुकीबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. या सुनावणीनंतर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया दिली.



"कोर्ट असे म्हणाले आहे की जी परवानगी देण्यात आली होती, ती काही अटी शर्तींसह देण्यात आली होती. त्या अटी शर्तींचे वारंवार उल्लंघन होत आहे. आंदोलकांकडून रस्त्यांवर सुरू असलेल्या वाईट गोष्टींबाबत कोर्टाने प्रचंड नाराजी व्यक्त केलेली आहे. त्यामुळे कोर्टाने काही निर्देश दिले आहेत. आता प्रशासन कोर्टाच्या निर्णयाचे उचित पालन करेल," असे रोखठोक मत फडणवीस यांनी व्यक्त केले.

"आमच्या बैठकांमध्ये आम्ही सर्व प्रकारच्या कायदेशीर बाबींचा आणि पर्यायांचा विचार केला आहे. आम्ही विचार केलेले पर्याय कोर्टासमोर कशा पद्धतीने टिकू शकतील याबाबत चर्चा झाली असून काही अधिकची माहिती मागवण्यात आली आहे. ती माहिती आल्यावरही आम्ही पुन्हा एकदा चर्चा केली आहे. यावर जो मार्ग काढायचा आहे तो कायदेशीर पद्धतीनेच काढला जावा अशी आमची इच्छा आहे. याबाबतच आमची कार्यवाही सुरू आहे," असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.


### महिला पत्रकारांशी आंदोलकांचे गैरवर्तन...

"आंदोलकांकडून महिला पत्रकारांवर हल्ला किंवा त्यांचा विनयभंग करण्याचा प्रयत्न हे आंदोलनाला गालबोट लावण्यासारखे आहे आपण यापूर्वी ३० पेक्षा जास्त मराठा मोर्चे पाहिलेले आहेत त्यांची शिस्त पाहिली आहे त्यावेळी सरकारने सकारात्मकतेने घेतलेला निर्णय आहे आपण पाहिलेला आहे अशावेळी आपले काम करत असलेल्या पत्रकारांना त्रास देणे योग्य नाही त्यामुळे असे हल्ले होणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारे नाही याचा सर्व स्तरातून निषेध झालाच पाहिजे

# ओबीसी आरक्षणाला धक्का लावू देणार नाही- भुजबळ

मुंबई, दि. १ प्रतिनिधी

आज छगन भुजबळ यांच्या उपस्थित राज्यातील महत्त्वाच्या ओबीसी नेत्यांची मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. आता मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये अन्यथा आम्ही लाखोंच्या संख्येने मुंबईत येऊ, असा इशाराच भुजबळ यांनी दिला आहे. त्यामुळे आता आरक्षणाचा मुद्दा जास्तच तापण्याची शक्यता आहे.



ओबीसी नेत्यांची बैठक झाल्यानंतर भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना कुठल्याही मुख्यमंत्र्याला किंवा सरकारला दोष देण्यात मला रस नाही. नियम, कायदा जे सांगतो तेच मी सांगतोय. त्यामुळे उगीचच हट्टाग्रह करत असेल तर सरकारने ते पाहून घ्यावं. पण आम्ही आता ठरवलं आहे. आम्ही उपोषण करणार. आम्ही जिल्ह्याजिल्ह्यातून, प्रत्येक तालुक्यातून मिरवणुका काढणार. आमच्यावर अन्याय झाला तर आम्हीसुद्धा लाखोंच्या लोंढ्याने मुंबईत आल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशाराच छगन भुजबळ यांनी दिला आहे.

जे बिचारे कुणबी आहे ते कुणबीच आहेत. आम्ही ते मान्य करतो. आमचा यावर कोणताही आक्षेप नाही. मागणी केली म्हणजे संविधान आणि कायदा बाजूला ठेवला जात नाही. कायदा आणि संविधान याप्रमाणाचे निर्णय घेतले जातील. उद्या एखादा म्हणेल की मला दलित समाजात टाका. मला त्यांना मिळणारा फायदा द्या, अशी मागणी कोणी करेल. आजघडीला ब्राह्मणांनाही शेती आहे. त्यामुळे त्यांना कुणबी म्हणता येईल का? असा सवालही भुजबळ यांनी केला.

# नाशिकच्या अर्थकारणाला चालना देणारा कुंभमेळा!

नाशिकमध्ये दर १२ वर्षांनी भरणाऱ्या कुंभमेळ्याला हिंदू परंपरेमध्ये विशेष महत्त्व आहे. लाखो करोडोच्या संख्येने भारतातूनच नव्हे तर देश, विदेशातून भाविक, पर्यटकया कुंभमेळात सहभागी होत असतात. हा केवळ धार्मिक उत्सव नसून या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते. यासाठी प्रशासनाच्या वतीने वर्षा- दोन वर्षाआधीच कुंभमेळ्याचा आराखडा तयार करून केंद्रीय व राज्यसस्तरावर सरकारकडून कोट्यवधी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले जाते. त्याचे योग्य नियोजन करून शहराच्या विकासाबरोबरच भाविकांना सेवा, सुविधा पुरविण्यावर भर दिला जातो.

कुंभमेळ्याचे ऐतिहासिक महत्त्वही फार मोठे आहे त्यामुळे भारतातीलच नव्हे तर अवघ्या देशभरातले भाविका कुंभमेळासाठी अतुरअसतात. भारताची सध्याची लोकसंख्या पाहिली तर १४० कोटींच्या आसपास आहे. या लोकसंख्येच्या १० टक्के लोक नाशिकमधील कुंभमेळ्यात सहभागी होतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या कुंभमेळ्यात कोट्यवधी लोक सहभाग नोंदवून रोकॉर्डब्रेकगर्दी होईल असे देखील वाटत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात सगळे लोक एका ठिकाणी जमणार म्हणजे आर्थिक व्यवहार आलेच, लोकांच्या राहण्यापासून खाण्यापासून ते येण्या-जाण्यापर्यंतचा सर्व खर्च आणि त्याच्याशी संबंधित सगळी उलाढाल आलीत. लोकांच्या सेवा आणि सुविधांसाठी रस्ते, सुरक्षा, राहण्यासाठीची व आरोग्याची सुविधा या कारणासाठी महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारकडून कोट्यवधी रुपयांचा निधी भेटणार असला तरी, या कुंभमेळातून सरकारलाहीमहसूल स्वरूपात मोठे उत्पन्न प्राप्त होणार आहे.

नाशिक शहराचा मोठा इतिहास असून आध्यत्मिक, सांस्कृतिक व धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून देशात ओळख जाते. याचबरोबर पुणे - नाशिक - मुंबई - या त्रिवेणी संगमात नाशिक देखील विकासाच्या दृष्टीने प्रगतीपथावर आहे. यामुळे भारतासह जगभरातल्या विविध कंपन्या इथे मार्केटिंग साठी उत्सुक असतात व मोठ्या प्रमाणात पैशांची गुंतवणूक करतात. परंतु, खऱ्याअर्थाने कुंभमेळ्यातील ही आर्थिक उलाढाल कशी असेल सरकारकडून जाहीर झालेल्या बजेट मधून काय योजना पुरवल्या जाणार आहेत. सरकारला या सगळ्यातून कसे व किती उत्पन्न मिळेल हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

मागील इतिहास बघितला तर कुंभमेळामध्ये श्रद्धा आणि व्यापारी यांचाही मेळ होताना बघायला मिळते. कुंभमेळ्याने लोकांसाठी रोजगार निर्मिती होते, कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याने अर्थव्यवस्थेलाही मोठा हातभार लावला जातो. कुंभमेळातून सरकारला टॅक्स रुपी, वस्तू व सेवांच्या माध्यमातून मोठा महसूल प्राप्त होतो. याच पार्श्वभूमीवर स्वच्छता, सुरक्षा आणि भाविकांच्या पायभूत सुविधांसाठी महाराष्ट्र




सरकारकडून मोठा निधी मिळत असल्याने शहराच्याविकासाचा कायापालट पाहण्यास मिळतो. यासाठी सरकारकडून कुंभमेळासाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करण्यात येते. कुंभमेळा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नाही, तर ते एक मोठे आर्थिक इंजिन आहे असे म्हटले जाते. याकुंभमेळ्यामुळे स्थानिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते. कुंभमेळात खाण्यापासून राहण्यापर्यंत ते पूजेसाठी लागणारी फुलं आणि पूजेच्या साहित्यापर्यंत सगळ्या गोष्टीतून सरकारच्या उत्पन्न वाढीला आणि पर्यायाने भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या आहे. राज्य व केंद्र सरकारला उत्पन्न मिळवून देणारे महत्वाचे स्रोत आहे असे म्हणायला हरकत नाही.

**कुंभमेळ्याचा अर्थकारणावर म्हणजेच अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम**

**सरकारी उत्पन्नात मोठी वाढ:-** कुंभमेळ्यामध्ये येणारे लाखो करोडो भाविकांचा राहण्याचा, खाण्यापिण्याचा खर्च जितका जास्त तितके सरकारला जीएसटी कराच्या माध्यमातून उत्पन्न वाढ होणार आहे.

**भाडेतत्वावरील जमीन-** व्यावसायिक, व्यापारी, खाजगी कंपन्या त्यांच्या व्यवसायासाठी सरकारकडून, स्थानिक प्राधिकरणाकडून, प्रशासनाकडून, जमिनी भाड्याने दिल्या जातात यातून साकारला उत्पन्न मिळणार आहे.

**इतर सोर्स-** सरकारला पैसे कमवून देणारा इतर सोर्स म्हणजे कुंभमेळ्यात ठिक ठिकाणी आपली दुकान लावणाऱ्या लोकांना दुकान मांडण्याचा परवाना, लायसन्स घ्यावे लागतात. फेरीवाले, विविध कला गुणाचे प्रदर्शन भरविणारे कलाकार असतील किंवा छोटे-मोठे व्यापारी असतील याचबरोबर स्थानिक प्रवास तिकेट्स, पार्किंग आणि मेंटेनन्स अशा सेवांचे चार्जेस त्यातूनही सरकारला फायदा होऊन सरकारी तिजोरीत वाढ होणार आहे.

**नव-नवीन व्यवसाय व रोजगाराच्या संधी-** कुंभमेळ्यादरम्यान लाखो भाविक, पर्यटक देशाच्या कानाकोपऱ्यातून येत असतात त्यांच्या येण्याजाण्याच्या पासून ते राहण्यापर्यंतच्या विविध गरजांसाठी वस्तू आणि सेवांची खरेदी करतात, ज्यामुळे स्थानिक व्यवसाय आणि रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात. हजारो कुटुंबांना नवनवीन व्यवसायाच्या संधी निर्माण होऊन रोजगार मिळेल. याचा फायदा केवळ नाशिक शहरातील लोकांनाच होईल असं नाही तर महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील व्यवसायिकांना देखील होईल.

**पर्यटनाला चालना-** कुंभमेळ्यामुळे पर्यटनाला मोठी चालना मिळते. भाविक विविध ठिकाणांहूनकुंभमेळ्या करितायेतात, त्यामुळे केवळ कुंभमेळा येथेच नव्हे इतर हि धार्मिक व पर्यटन स्थळांनाभाविकभेट देतात. ज्यामुळे हॉटेल, वाहतूक आणि इतर पर्यटन-संबंधित व्यवसायांना मोठा आर्थिक फायदा होऊन अर्थकारणाला चालना मिळते.

**पायाभूत सुविधांचा विकास-** महाकुंभ मेळ्याच्या तयारीसाठी सरकार मोठ्या प्रमाणात नागरिकांकरिता पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करते, जसे की दळणवळणसाठी रस्ते, एअरपोर्ट, पूल, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्यसंबंधीच्या उपाययोजना, पार्किंग अशा अनेक महत्वपूर्ण बाबी विचारात घेऊनकुंभमेळ्यामुळे शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास होण्यास मदत होऊनअर्थकारणाला चालना मिळते.

**देशाच्या जीडीपी मध्ये वाढ-** कुंभमेळ्यामुळे खर्च, गुंतवणूक आणि उत्पन्नाचे चक्र हे अधिक गतिमान होऊन लाखो, करोडो रुपयांची उलाढाल होत असल्याने एकंदरीतच देशाच्याजीडीपी मध्ये वाढ होण्यास मदत होते.



**- योगेश कातकाडे,**
**कर सल्लागार व प्रमाणित लेखापरीक्षक**
**जनसंपर्क प्रमुख- नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, नवीन नाशिक**

## पेठला झिरवाळांच्या उपस्थितीत विविध शासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी यांची आढावा बैठक

**पेठ ।** येथील तहसिल कार्यालयातील आवारात राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी तालुक्यातील विविध शासकीय विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांची आढावा बैठक घेत नागरिकांच्या विविध समस्यांवर चर्चा करून त्या तात्काळ सोडवून घेण्यासाठी अधिकारी वर्गाला सुचित करण्यात आले.



बैठकी दरम्यान शासकीय जमिनीचा विषय प्रामुख्याने मांडण्यात आले शासनाच्या विविध योजना व नवीन कार्यालये, अभ्यासिका, कृषी उत्पन्न बाजार समिती अशा अनेक इमारतीसाठी जमिनीची उपलब्धता करण्यासाठी चर्चा करण्यात आली. तालुक्यातील रस्त्यावरील खड्डे व रस्त्याची झालेली दुरावस्था याबाबत तात्काळ कारवाई चरून नागरिकांच्या समस्या दुर करण्यात याव्यात आरोग्य विभागातील औषधांची कमतरता व अपुरा कर्मचारीवर्ग आदीसह कृषी विभाग, वनविभाग, सार्वजनिक बांधकाम, पंचायत समिती तहसील, आदीसह इतर विभागांचाही आढावा घेण्यात आला. यावेळी तहसिदार अशा गांगुर्डे, नायब तहसीलदार दिपक गोवर्धने, युवा नेते गोकुळ झिरवाळ जेष्ठ नेते भास्कर गावीत, रामदास गवळी, भिकाजी चौधरी, शिंदेचे उपसरपंच हिरामण पवार, रामदास वाघेरे, सुरेश खंबाईत, सुयोग गवळी, नामदेव मोहंडकर, भाजपा तालुकाध्यक्ष पंकज पाटील, विशाल जाधव, माजी उपसभापती, महेश टोपले, निवृत्ती गवळी, गणेश गवळी, करंजाळीचे सरपंच दुर्गादास गवळी, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष गणपत चौधरी, नगराध्यक्ष करण करवंदे, उपाध्यक्ष गणेश गावीत, नगरसेवक रामदास गायकवाड, युवराज लिमले, विजत धुम, शितल रहाणे, रामेश्वरी जाधव, मनोहर टोपले, विलास जाधव, शाम गावंडे, बाळु गवळी आदीसह विविध शासकीय विभाग प्रमुख व नागरिक उपस्थित होते.

## व्ही.एन. नाईक महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**नाशिक ।** येथील व्ही.एन. नाईक शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व शासकीय जिल्हा रुग्णालयाच्या मेट्रो रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.




शिबिरास संस्थेचे अध्यक्ष कोंडाजी आव्हाड, संचालक शरद बोडके, बाळासाहेब धात्रक, राजेश दरगोडे, प्राचार्य डॉ.संजय सानप, उपप्राचार्य डॉ.पोर्णिमा बोडके, सेवक संचालक विवेक गामणे, अभियंत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास चंद्रात्रे, औषधनिर्मिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश दरेकर आदी मान्यवरांनी भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. रक्तदान शिबिरात ५१ विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ.संजय सानप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी डॉ.समीन शेख, डॉ.संध्या सोनकांबळे, डॉ.रेखा जाधव, डॉ.मनिषा धिवरे, प्रियांका सांगळे, डॉ.संदीप चव्हाण, प्रा. शुभम दराडे, प्रा कैलास चौधरी, एन.एस.एस स्वयंसेवक उमेश सिताड, सत्यम सिंह, आशीष दांडे,अथर्व सुपेकर,नयन सोनवणे, रितेश घुगे,अथर्व पाटील,फरहान शेख,काजल कानडे, अंतरा रणमाले,शीतल कोरडे, मयुरी महाले, खुशी संसले, माधुरी धनगर, देवांग पाटील,प्रणय कर्डक,खुशी सिंह, साक्षी मोगल, भूमिका शेंडे यांच्यासह प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, स्वयंसेवक व विद्यार्थी वर्ग यांनी प्रयत्न केले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.शरद काकड, सेवक प्रतिनिधी विवेक गामने, कार्यालय अधीक्षक हसन तिवडे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.धीरज झाल्टे, आय.क्यू.एसी समन्वयक डॉ.राजेंद्र झोळेकर, डॉ.हेमंत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रेरणा दिली.

## ➤ महत्त्वाचे

### हिरे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये नॅक मूल्यांकन

**नाशिक ।** उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्तावृद्धी आणि नॅक मूल्यांकन प्रक्रियेत झालेल्या नव्या बदलांविषयी प्राध्यापकांना सविस्तर माहिती देण्यासाठी समाजश्री प्रशांतदादा हिरे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये



एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत लोकनेते व्यंकटराव हिरे आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, पंचवटी, नाशिक या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे हे प्रमुख व्याख्याते म्हणून लाभले. ही कार्यशाळा महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे आणि महाविद्यालय विकास समिती प्रमुख डॉ. संतोष तांबे यांच्या संकल्पनेतून घेण्यात आली. महाविद्यालयाचे नॅक व आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ. चेतन बागुल यांनी आपल्या प्रस्तावनेत नॅक मूल्यांकनबद्दल माहिती देऊन या कार्यशाळेचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे यांनी आपल्या मनोगतात नॅक मूल्यांकन ही केवळ गुणांकनाची प्रक्रिया नसून महाविद्यालयाच्या शैक्षणिक दर्जाचे व विद्यार्थ्यांप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतिबिंब असल्याचे सांगितले. "बायनरी ग्रेडिंग सिस्टिम महाविद्यालयांना पारदर्शकता, जबाबदारी आणि शैक्षणिक गुणवत्ता राखण्यास प्रवृत्त करणारी आहे," असे त्यांनी मत व्यक्त केले. महाविद्यालय विकास समिती प्रमुख डॉ. संतोष तांबे, प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांनीही माहिती दिली.

### गणेश दर्शनासाठी गर्दी सुरू

**नाशिक ।** गणेशोत्सव सुरू होऊन चार दिवस लोटले आहेत. आता गणेशोत्सव रंगात येऊ लागला आहे. नागरिक आरास, देखावे बघण्यासाठी घराबाहेर पडू लागले आहेत.

### पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी : रेखा म्हस्के

**नाशिकरोड ।** गणेशोत्सव साजरा करताना नद्यांसह पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही, असे प्रयत्न आपण केले पाहिजे. त्यासाठी शाश्वत, पर्यावरणपूरक आणि पुन्हा वापरता येणारी श्री गणेशाच्या धातूच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी. कारण पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन वॉव समूहाच्या




रेखा म्हस्के यांनी केले. पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात वॉव समूहाच्या वतीने आरंभ अभियानाच्या द्वितीय वर्षी 'घरोघरी बाप्पा मनात भक्ती; धातूची मूर्ती देई प्रदूषणापासून मुक्ती' या उपक्रमात त्या बोलत होत्या. मंचावर वॉव समूहाच्या संस्थापिका अश्विनी न्याहारकर, अध्यक्षा विभा खोत, संचालिका माधुरी कोतवाल, सुनंदा रहाणे, सुषमा जाधव, मुख्याध्यापक अरुण पगार उपस्थित होते. यावेळी वॉव समूहाच्या वतीने विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याच्या आवश्यकतेबद्दल माहिती दिली. मुख्याध्यापक अरुण पगार, शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

## निर्यात बंदी उठविण्यासंदर्भात खा. भगरे यांना शेतकऱ्यांचे निवेदन



**नाशिक ।** पिंपळगाव बसवंत येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये टोमॅटोला दीडशे २०० रुपये प्रति वीस किलो कॅरेटला भाव मिळाल्यामुळे शेतकऱ्यात संताप निर्माण झाला असून, तात्काळ पाकिस्तान बांगलादेश दुबई व नेपाळ व इतर देशाच्या सीमा खुल्या करून निर्यात बंदी उठवावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी खासदार भास्कर भगरे यांना निवेदन दिले.

आमच्या भावना केंद्र सरकारपर्यंत पोहोचवाव्या व निर्यात बंदी तात्काळ उठवावी अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले. यावेळी शामराव मोरे, अशोकराव भवर, तुकाराम भवर, सचिन हिरे, दत्तात्रय देवकर, संग्राम परदेशी, भिकन परदेशी आदींसह शेतकरी उपस्थित होते. टोमॅटो वरील निर्यात बंदी तात्काळ नाही उठल्यास पुढील काळात शेतकरी तीव्र स्वरूपाचचे आंदोलन उभारतील, असा इशाराही निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी दिला आहे.

या निवेदनावर देवेंद्र काजळे, दिलीप मेंगाने, सतीश खोडे, प्रवीण खोडे, नितीन बनकर, भिकन परदेशी, दत्तात्रय देवकर ,गोरख देवकर, ऋषिकेश वाटपाडे, संतोष निरगुडे, दत्तात्रय कागदे, प्रशांत घोडके, विशाल गवळी, सागर गवळी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ओझर बाजार समितीत तीन सप्टेंबरला शेतकरी मेळावा

**नाशिक ।** शेतकरी नेते शरद जोशी यांच्या



जयंतीनिमित्त नाशिक जिल्हा शेतकरी संघटनेच्यावतीने दि. ३ सप्टेंबर रोजी ओझर बाजार समितीत शेतकरी संघटनेच्या मेळाव्याच्या आयोजन करण्यात आले आहे. दुपारी एक वाजता हा मेळावा होणार आहे. शरद जोशी यांच्या स्मृति दिनानिमित्ताने त्यांच्या स्मृती जागविण्यासाठी व शेतकऱ्यांची हितासाठी आहुती देणाऱ्या शहीद यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते रामचंद्र बापू पाटील, उत्तमराव कांबळे, देविदास पवार, स्मिता गुरव, निर्मला जगजाप. डॉ शामा अष्टेकर आदींची प्रमुख उपस्थिती उपस्थित राहणार आहे. नाशिक जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नाशिक जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन बोराडे यांनी केले आहे.

## शिवस्वराज्य मित्र मंडळातर्फे श्री गणेशा आरोग्य शिबिराचे आयोजन

**मखमलाबाद ।** मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष व सार्वजनिक गणेश मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गुरुजी रूग्णालय नाशिकच्या सौजन्याने शिवस्वराज्य कला क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ विद्यानगर तर्फे श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य महाभियान २०२५ चे आयोजन ज्ञानशारदा सार्वजनिक वाचनालय विद्यानगर मखमलाबाद रोड येथे करण्यात आले होते.

यावेळी सर्व नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. मोफत रक्ततपासणी, ब्लड प्रेशर, नेत्र तपासणी करून आवश्यक त्या रूग्णांना मोफत औषधोपचार देखील करण्यात आले. तसेच आशासेविकांच्या मदतीने परिसरातील नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड वाटप व नोंदणी करण्यात आली. भाजपा शहर सरचिटणीस अमित घुगे, भाजपा पंचवटी मंडल अध्यक्ष राहुल कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य ज्ञानेश्वर काकड यांच्या उपस्थितीत शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्री गुरूजी रूग्णालयाच्या वतीने डॉ. अभय शुक्ल,



डॉ.शर्मिला कुलकर्णी, डॉ.पुष्पेंद्र गांगुर्डे आदींसह नर्सेस पॅरामेडिकल स्टाफ उपस्थित होते. या महाआरोग्य शिबीराचे आयोजन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा प्रदेश सचिव डॉ.ऋषिकेश आहेर व नाशिक जिल्हा कॉलेज टिचर्स पतसंस्थेच्या चेअरमन प्रा. वैशाली आहेर (कोकाटे) यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मिलींद काळे, अमेय औटे, कुणाल मुर्तडक, धनराज रत्नपारखी, पवन कानकाटे, जयेश भोईर, ओम मुठेकर, प्रथमेश चव्हाण, जतिन जाधव, श्लोक शिंदे, मयुर गोळे, चैतन्य जंगम, साई पांचाळ, संकेत माळी आदींनी परिश्रम घेतले.

## आजचे युग हे माध्यमांचे : रविराज गंधे

### केटीएचएम महाविद्यालयात पत्रकारिता विभागाच्या इंडक्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नाशिक ।** "आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे असले तरी लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे कार्य प्रभावीपणे पार पाडणारी माध्यमे हीच खऱ्या अर्थाने युगनिर्मिती करत आहेत. त्यामुळे आजचे जग हे माध्यमांचे आहे," असे मत मुंबई दूरदर्शन केंद्राचे माजी कार्यक्रम अधिकारी रविराज गंधे यांनी व्यक्त केले.

केटीएचएम महाविद्यालयाच्या एम.ए. पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग व बी.होक मास मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यार्थ्यांच्या इंडक्शन कार्यक्रमात गंधे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागप्रमुख प्रा. प्राची पिसोळकर यांनी त्यांची मुलाखत घेतली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कल्पना अहिरे होत्या. बी.होक मास मीडिया विभाग प्रमुख प्रा. गोकुळ सानप, प्रा. योगेशकुमार होले, प्रा. आरती मंत्री व प्रा. गोकुळ काळोगे यांची प्रमुख उपस्थिती होती. गंधे यांनी बोलताना सांगितले की, "आधुनिक तंत्रज्ञानामुळे माहितीचा महापूर निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारच्या माध्यमांचा अभ्यास करूनच आपली कारकीर्द घडवावी. सोशल मीडियावर मिळणारी माहिती किती विश्वासार्ह आहे, याची पडताळणी करणे गरजेचे आहे. याउलट, वृत्तपत्रांमधील बातम्या व लेख हे माहिती व




ज्ञानाच्या दृष्टीने अधिक विश्वासार्ह असतात." या कार्यक्रमात त्यांनी दूरदर्शनची वाटचाल, त्यातील बदल आणि संधी यावर सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरेही दिली. प्राचार्या डॉ. कल्पना अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "समाज माध्यमे ही केवळ माहिती देणारी नसून मनोरंजन व शिक्षणाचेही साधन आहेत. पत्रकारितेच्या अभ्यासक्रमातून मिळणारे ज्ञान तुम्हाला आत्मविश्वासाने पुढे जाण्यास सक्षम करते." कार्यक्रमात विद्यार्थ्यांना माध्यम क्षेत्रातील विविध संधी, आव्हाने व जबाबदाऱ्या यांची माहिती मिळाली असून, त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

## महत्त्वाचे

### मराठा आंदोलकांसाठी दिंडोरी तालुक्यातून खाद्य सामग्रीची रसद मुंबईला रवाना

**दिंडोरी ।** मुंबईच्या मराठा मोर्चा आंदोलनस्थळी सरकारने हॉटेल बंद केल्याने



आंदोलकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी दिंडोरी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते सरसावले असून दिंडोरी तालुक्यातून सहा वाहने विविध खाद्य सामग्री घेऊन मुंबईला रवाना झाले आहे. तालुक्यातील विविध गावातून दररोज खाद्य सामग्री पोहचवली जाणार आहे. एक व्हाट्स ग्रुप वर बाजार समितीचे उपसभापती योगेश बर्डे यांनी आवाहन करताच तालुक्यातील म्हेळूस्के,मडकी जांब, वणी, मावडी, वरखेडा, हस्ते माळे, वणी खुर्द, राशेगाव, निळवंडी अशा विविध गावातून मोठ्या प्रमाणावर साहित्य जमा झाले.दिंडोरी बाजार समितीचे सभापती प्रशांत कड,उपसभापती योगेश बर्डे, मराठा महासंघाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब घडवजे,गंगाधर निखाडे, सदानंद शिवले,भूषण घडवजे, नंदू घुमरे, राहुल ढगे,नाना सोनवणे, रोहित बर्डे, सचिन वडजे, विलास वडजे, जितेंद्र वडजे, दिलीप पताडे यांसह विविध पदाधिकाऱ्यांनी याबाबत नियोजन केले. खाद्यसामग्रीचे पाच वाहने घेऊन हे सर्व पदाधिकारी मुंबईला रवाना झाले. विशेष म्हणजे अनेक आदिवासी ओबीसी बांधवांनी ही मदत दिली. सर्व जाती धर्मातील ग्रामस्थ आणि शेतकरी वर्गाचे दातृत्व यातून चर्चेचा विषय ठरले आहे. दिंडोरी तालुक्यातून दररोज मदत पोहचवीण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. खाद्य सामग्रीत पाणी, भाकरी चटणी भाजी भत्ता फरसाण आदी साहित्य जमा झाले ते सहा गाड्यांमध्ये भरून मुंबईला पाठविण्यात आले.

### थकबाकीदारांसाठी मनपाची अभय योजना

**नाशिक ।** नाशिक महापालिका प्रशासनाकडून थकबाकीदारांना दिलासा देण्यासाठी गेल्या वर्षाप्रमाणे यंदाही ९५ टक्के माफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या वर्षी अभय योजनेला उत्तम प्रतिसाद मिळाल्याने पालिकेच्या महसुलात वाढ झाली होती. या अभय योजनेसाठी तीन टप्पे ठरवण्यात आले आहे. १ सप्टेंबर ते १ऑक्टोबर या कालावधीत ९५ टक्के दंड माफ, १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ८५ टक्के दंड माफ करण्यात येणार आहे. मालमत्ताधारकांनी त्याचा लाभ घेत कर भरणा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मागील वर्षी या तीन महिन्यांच्या कालावधीत तब्बल ११० कोटींचा मालमत्ता कर भरणा झाला होता. त्यामुळे मनपाला सवलत योजना हमखास पावते व मनपाची तिजोरी मालामाल होते हे पहायला मिळते. यंदा महापालिकेने रेकॉर्डब्रेक २५६ कोटींचा मालमत्ता कर वसूल केला. त्यात सवलत योजना महत्त्वपूर्ण होती. नियमित करदात्यांना प्रोत्साहन म्हणून महापालिका करसंकलन विभाग सवलत योजना राबवते. मालमत्ताधारकांनी सवलतीच्या कालावधीत कर भरणा केल्यास त्यांना एकूण बिल रकमेवर आठ टक्के सूट दिली जाते. हाच कर भरणा ऑनलाइन अदा केल्यास दहा टक्के सूट मिळते.

### दोन लाख भाकरी अन् मिरचीच ठेचा

**नाशिक ।** दोन लाख भाकरी...तीन लाख पाण्याच्या बाटल्या...जोडीला मिरचीचा ठेचा.. लोणचं..अशी शिदोरी घेऊन जिल्ह्यातून सात पिकअप रविवारी (दि.३१) मुंबईच्या दिशेने रवाना झाल्या. आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आंदोलकांना राज्यभरातून आहार पुरविला जात असून त्यात नाशिकचा वाटा अधिक आहे. राज्यभरातून या आंदोलकांना आहार पुरविला जात आहे. नाशिक जिल्ह्यात एक भाकर समाजासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. त्यास भरभरून प्रतिसाद मिळत आहे. गावागावातून भाकरी दिल्या जात आहेत. काही गावांनी दहा तर काही गावांनी वीस , अशा जमेल त्या पध्दतीने भाकरी पाठविल्या आहेत. रविवारी दरी, मातोरी, दिंडोरी, वणी, सिन्नर, वावी, पांगरी यासारख्या अनेक गावांमधून तब्बल दोन लाख भाकरी जमा झाल्या. त्यासोबत मिरचीचा ठेचा, कांदे, पापड, लोणचे हे पदार्थही पाठविण्यात आले.

### मोदक वाटपाची अखंड परंपरा...

**नाशिक ।** भद्रकाली नगरीतील मानाचे व परंपरेचे प्रतीक असलेले भारत मित्र मंडळ हे “लटिंगचा गणपती” म्हणून ओळखले जाते. गणेश उत्सव हा गेली ७० वर्षे भक्तिभावाने सुरू असलेली. महाप्रसादाची अखंड परंपरा आजही तितक्याच उत्साहात आणि भक्तिभावाने सुरू आहे. गणपती बाप्पाला अकरा हजार मोदकांचा नैवेद्य दाखवण्याची ही आगळीवेगळी परंपरा मंडळाने जपली आहे. खास करून या मोदकांत केवळ खोबरेच नाही, तर खवा, सुकामेवा आणि आरोग्यवर्धक घटकांचा समावेश केला जातो. बाप्पाला अर्पण झालेला हा मोदक महाप्रसाद म्हणून सर्व वर्गणीदार व देणगीदारांना वाटप केला जातो, आणि प्रसादातून सर्वांना आरोग्य, समाधान व आनंद मिळावा याची काळजी मंडळ प्रेमाने घेत असते. या कार्यात मंडळातील बाळासाहेब लोणारी, किरण नवले, संदीप उगले, युवराज वाईकर, भालचंद्र सोनवणे आदी सहभागी झाले होते.

# फैज बँकेत कर्जदारांची फसवणूक; भरणा पावत्यांमध्ये फेरफार


**नाशिक ।** जुने नाशिक परिसरातील अवसायानात गेलेली फैज मर्कन्टाईल को-ऑपरेटिव्ह बँकेत कर्जदारांनी भरलेले पैसे बँकेच्या खात्यात न जमा करता भरणा पावत्यांमध्ये फेरफार करून कमी रकमेची नोंद करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार लेखा परीक्षणात उघड झाला आहे. फिरते पथक लेखा परीक्षक आर. पी. गायकवाड यांनी केलेल्या तपासणीत हा गंभीर प्रकार समोर आला आहे. त्यामुळे कर्जदार हवालदिल झाले असून संबंधित भामट्यां विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे. जुने नाशिक परिसरातील फैज मर्कंटाइल बँक दोन वर्षांपूर्वी अवसायनात निघालेली आहे. या बँकेवर किशोर महाजन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम बघत आहेत. बँकेच्या कर्जदारांकडून सध्या वसुलीचे काम सुरू असून कर्ज खात्यात भरणा होत असलेल्या पैशांवर बँकेचे कर्मचारी परस्पर डल्ला मारत असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी कर्जदारांना संशय आला असता त्यांनी बँकेकडे




वारंवार खातेउतारा मागत शहानिशा करण्याचा प्रयत्न केला.मात्र बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महाजन व कर्मचाऱ्यांनी तुमचे खाते निरंक झाले असून,नेट कनेक्शन बंद आहे. त्यामुळे देता येणार नाही अशी टोलवाटोलवी केली. बँक अधिकाऱ्यांकडून माहिती मिळण्यासाठी टाळाटाळ केली जात असल्याचे लक्षात येताच.यामुळे कर्जदारांनी २९ जुलै रोजी




उपनिबंधक कार्यालयात तक्रार अर्ज दाखल केला. त्यानुसार गायकवाड यांनी ३१ जुलै रोजी लेखापरीक्षण करून अहवाल दिला. अहवालानुसार, एका कर्जदाराने २९ मार्च २०२५ रोजी २ लाख ४० हजार रुपये भरले. मात्र, मात्र बँकेतील कर्मचाऱ्यांनी पावती क्रमांक बदलून फक्त २ लाख ८ हजाराची नोंद केली व उर्वरित ३२ हजार रुपये हातावर ठेवण्यात आले. ही रक्कम ताबडतोब नोंदवली




न जाता लेखापरीक्षण होण्याच्या दोन दिवस आधी जमा करण्यात आली. साधारण चार महिने बँकेच्या कर्मचाऱ्यांनी ही रक्कम स्वतःजवळ ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसऱ्या कर्जदाराने १८ जून २०२५ रोजी ७५ हजार रुपये भरले. त्या दिवशीच खाते निरंक झाल्याचा दाखला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिला. परंतु प्रत्यक्ष भरलेली रक्कम तब्बल दीड महिन्यानंतर जमा करण्यात आली.ते देखील लेखापरीक्षणाच्या दोन दिवस आधी. त्यामुळे हा अत्यंत गंभीर प्रकार असून कर्मचाऱ्यांच्या विश्वासहार्यतेवर संशय निर्माण करणारा आहे. फैज बँकेच्या कर्मचाऱ्यांनी कर्जदारांकडून

**या प्रकरणी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर महाजन यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांना दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांनी फोन घेतला नाही. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.**

रक्कम वसूल करूनही ती नियमानुसार त्याच दिवशी जमा न करता पावत्या बदलून फसवणूक केली असल्याचे स्पष्ट होत आहे. या कृत्यामुळे कर्जदार व ठेवीदारांचा विश्वासघात झाला आहे.फैज बँकेची आधीच अवसायानात गेलेली परिस्थिती लक्षात घेता, कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीर कृत्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप होता का, याबाबतही संशय उपस्थित केला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

# राहुल धोत्रे हत्याकांड; दोघे संशयित जेरबंद

## गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाचे यश

**नाशिक ।** नांदूर नाका परिसरात झालेल्या राहूल धोत्रे हत्याकांडातील फरारी संतोष बाळू मते तसेच स्वप्निल मदन बागुल यांना जेरबंद करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाला यश आले आहे. मात्र यातील संशयित व भाजपाचा माजी नगरसेवक उद्धव निमसे अद्यापर्यंत फरारच आहे. २२ ऑगस्टला सायंकाळी झालेल्या किरकोळ वादातून राहूल धोत्रे व आते भाऊ अजय कुसाळकर यांचा पाठलाग करून धारदार शस्त्राने सपासप वार करण्यात आले होते. यात दोघेही गंभीर जखमी झाल्याने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान राहूल धोत्रे याचा मृत्यू झाल्याने संतप्त नातेवाईक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी हल्लेखोरांसह माजी नगरसेवक उद्धव निमसे याला अटक होत नाही तोपर्यत मृतदेह न स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. यातील हल्लेखोरांना पकडण्यासाठी आडगाव



पोलीस तसेच गुन्हे शाखेची पथके माग काढत असता हवालदार प्रशांत मरकड व मिलींदसिंग परदेशी यांना बातमी मिळाली की, फरार सतोष मते हा वाडीवऱ्हे कवटी फाटा येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने पथकाने तेथे जावून संतोष बाळू मते यास ताब्यात घेण्यात आले. याच दरम्यान हवालदार विशाल देवरे व प्रविण वाघमरे यांना बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, यातील संशयित स्वप्नील बागुल हा पपया नर्सरी जवळ नाशिक येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने, स्वप्निल मदन बागुल यास ताब्यात घेतले.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट एक पोलीस निरीक्षक मधुकर कड, उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, सुदाम सांगळे,, किरण शिरसाठ, हवालदार प्रदीप म्हसदे, मिलीदसिंग परदेशी, प्रविण वाघमारे, विशाल देवरे, प्रशांत मरकड, योगीराज गायकवाड, संदीप भांड, नाजीमस्थान पठाण, रोहिदास लिलके, मुक्तार शेख, अमोल कोष्टी, मनिषा सरोदे यांनी ही कामगिरी बजावली आहे.

# परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न

## - कॅप्टन आशिष दामले यांचे प्रतिपादन । चित्तपावन ब्राह्मण संघ देणगीदार गौरव




**नाशिक ।** परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे पुणे येथील मध्यवर्ती कार्यालय सुरू झाले आहे. त्या माध्यमातून गरजू ब्राह्मणांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी ठोस प्रयत्न केले जातील. हे एकमेव महामंडळ महिला बचतगटांना प्रथमच अर्थसहाय्य करणार असून आदर्श वस्तुपाठ ठरेल. नाशिकच्या परशुराम भवनपासून प्रेरणा घेऊन डोंबिवली, सातारा, इचलकरंजी येथे देखील लवकरच भव्य परशुराम भवन वास्तू निर्माण होतील असे प्रतिपादन कॅप्टन आशिष दामले यांनी केले. ते चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे आयोजित देणगीदार सत्कार समारंभात बोलत होते.

रविवारी सायंकाळी सी.बी.एस.जवळ श्री परशुराम भवन येथे बापये सभागृहात देणगीदार सत्कार समारंभ झाला. प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष विजय साने यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची व ९३ वर्षांच्या वाटचालीची माहिती दिली. विश्वस्त प्रा. दिलीप फडके यांच्या हस्ते मान्यवर पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. परशुराम भवन वास्तू निर्माण प्रकल्पासाठी भरघोस देणगी देणाऱ्या ८० प्रमुख देणगीदारांचा सत्कार गणेशोत्सवाच्या औचित्याने करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक व सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच नाबार्डचे संचालक सतीश मराठे आणि परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले उपस्थित होते. त्यांच्या हस्ते देणगीदार अंकुश रहाळकर, श्रीमती सुहासिनी साने, जयंत जोगळेकर, अविनाश गाडगीळ, रवींद्र बेडेकर, देवेंद्र बापट, विवेक गोगटे, शशांक वैशंपायन, शैलजा लवेकर, संध्या केळकर, मंगला आपटे यांच्यासह ८० देणगीदारांना शाल, पुष्पगुच्छ, परशुरामाची प्रतिमा असलेलेले सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याशिवाय श्री परशुराम शिल्पाचे शिल्पकार संदीप लोंढे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कॅप्टन दामले पुढे म्हणाले, परशुराम आर्थिक विकास महामंडळातर्फे गरजूंना व्यक्तिगत तसेच भागीदारी व्यवसायासाठी कर्ज देण्यात येईल. पुरोहितांना सहाय्य, ब्राह्मण शेतकऱ्यांना अर्थसहाय्य केले जाईल. असे त्यांनी नमूद केले. सतीश मराठे यांनी परशुरामाने शास्त्र व शस्त्र यांचा समन्वय घडवून समाजाचा उध्दार केला असे सांगितले. त्यांनी देशाच्या आर्थिक विकासाचा आलेख मांडून ब्राह्मण युवकांनी उद्योजक व्हावे म्हणजे समाजाची आर्थिक क्षमता वाढेल असा सल्ला नव्या पिढीला दिला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन देवदत्त जोशी यांनी तर सत्कारार्थी देणगीदारांच्या यादीचे वाचन हेमंत वाड व संस्थेचे सचिव नितीन सहस्रबुद्धे यांनी केले. कोषाध्यक्ष हेरंब घारपुरे यांनी आभार मानले. यावेळी विश्वस्त, कार्यकारिणी सदस्य तसेच निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थितहोते.

# श्री गणेश उत्सव ऊर्जादायक : डॉ. गुट्टे महाराज

## केम्ब्रिज हायस्कूल येथे शेकडो विद्यार्थ्यांनी घेतली अनुभूती





**नाशिक ।** श्री गणेश अथर्वशीर्ष पठण केल्याने आत्मविश्वास वाढतो. मनुष्य संयमी बनत असून, त्याला आत्मबळ मिळते. श्री गणेश उत्सव हा ऊर्जादायक आहे. मनाला शांती मिळून घरात एक सकारात्मक ऊर्जावलय तयार होतात. आपल्याला एक आंतरिक समाधान लाभत असल्याचे विचार संत साहित्याचे गाढे अभ्यासक व सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे संस्थापक अध्यक्ष स्वामी डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे महाराज यांनी केले.

शहरातील वडाळा पाथर्डी रोडवरील केम्ब्रिज हायस्कूल येथे शेकडो विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष पठण केले. स्वामी डॉ. गुट्टे महाराज यांनी सांगितले की श्री गणेश बुद्धीची देवता म्हणून ओळखली जाते. गणपती बीज मंत्रात ५ देवतेचा वास असतो. त्याची पूजा केल्याने उत्साह व ऊर्जा मिळते.मनात चैतन्य येते. अथर्व शीर्ष पठण केल्याने मनुष्य निर्भय बनतो. सकारात्मक ऊर्जा मिळून आपल्या कार्याला गती प्राप्त होते. जीवनात संयमी राहिल्याने आपला स्वतःचाच विकास होतो. श्री गणेशाची कृपा संपादित करून घ्या.व आपले जीवन सुखी करा असे आवाहन केले. या प्रसंगी डॉ.आशुतोष माळी , डॉ.देवेंद्र बेलन,डॉ. जोशी सर, प्राचार्य सुंदर , विजया राहणे, संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष राहुल रामचंद्रण, मनोज लोणकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, व विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. नृत्य करून गणेश वंदना सादर केली. ५ वी ते नववी च्या सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. डॉ गुट्टे महाराज यांनी असे उपक्रम घेतल्याबद्दल शाळेचे अभिनंदन व कौतुकही केले.आपल्या नातवाचे कौतुक पाहण्यासाठी विद्यार्थ्यांचे आजी आजोबा ही उपस्थित होते. गणपतीची आराधना नृत्य व तबल्यावर गणेश परण वाजवून करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली.

### गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने परिसर दणाणला

नाशिक केम्ब्रिज विद्यालयामध्ये दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ज्युनियर आणि सिनियर केजीच्या ४५० विद्यार्थ्यांनी गणपती स्तोत्राचे पठन केले तर ५ ते ९ च्या ६८० विद्यार्थ्यांनी गणपती अर्थवशीर्षाचे पाच आवर्तनांची शब्द सुमनांजलि गणेश चरणी वाहिली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ प्राध्यापक तुळशीराम गुट्टे महाराज यांनी रसाळ वाणीत विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. संस्थेचे विश्वस्त भारती रामचंद्रन व राहुल रामचंद्रन यांनी कार्यक्रमाला प्रेरणा दिली.

# नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाचे शिक्षक पुरस्कार जाहीर

## ११ सप्टेंबर रोजी उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांच्या हस्ते होणार गौरव

**नाशिक ।** सार्वजनिक वाचनालय नाशिक आणि नागरिक शिक्षक गौरव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या शिक्षक गौरव पुरस्कारांची घोषणा सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, शिक्षक गौरव समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.किशोर पवार, उपाध्यक्ष राजेंद्र निकम यांनी शनिवारी सभेत जाहीर केले.

वाचनालयाकडे आणि नागरिक शिक्षक गौरव समितीकडे आलेल्या विविध प्रस्तावातून निवड समितीने निवड केलेल्या पुरस्कारार्थींची नवे उपाध्यक्ष राजेंद्र निकम यांनी सभेपुढे वाचून दाखवली. सर्व निवड करण्यात आलेल्या आदर्श शिक्षकांचा गौरव ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता राज्याचे उद्योग मंत्री व मराठी भाषा मंत्री ना. उदय सामंत यांच्या शुभ हस्ते व वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके यांच्या अध्यक्षतेखाली सन्मान चिन्हे व प्रमाणपत्र देवून करण्यात येणार आहे.

**यांचा होणार गौरव**– १. प्राथमिक विभाग (मनपा)- योगेश महारु सूर्यवंशी (शाळा क्र. २७, अशोक नगर), अविनाश नामदेव पवार (शाळा क्र. ४६ उपनगर), २. प्राथमिक विभाग (खासगी)- सौ. अनुराधा उत्तमराव बस्ते (सरस्वती विद्यालय), सौ. ज्योती वालझाडे (बालक मंदिर, मराठी माध्यम), ३. माध्यमिक विभाग सौ. शामल योगेंद्र पाटील (सरडा कन्या विद्यालय), सौ. कनकलता साकोरीकर (आरपी विद्यालय), विनीत धर्मराज पवार (जनता विद्यालय, सातपूर), सौ. वैशाली विशाल मुळे (विद्याप्रबोधिनी प्रशाला)

मुख्याध्यापक- संजय निवृत्ती डेर्ले (सी एम विद्यालय, मखमलाबाद), सेवा निवृत्त माध्यमिक मुख्याध्यापक- सौ. कुंदा जोशी (सिडीओ मेरी हायस्कूल), सेवा निवृत्त प्राथमिक मुख्याध्यापक- अनुराधा माधव नामजोशी (शिशु विहार बालक मंदिर) महाविद्यालयीन- नागेश्वर राघव भदाणे (प्राचार्य के.टी.एच एम), व्यावसायिक- द्विवेदी अरुणकुमार ओमकारनाथ, संशोधक सुनीता हनुमंत पाटील, विज्ञान- डॉ. प्रमोद हिरे (एच पी टी महाविद्यालय), संत साहित्य- डॉ. गजानन वामनराव आंभोरे, विशेष कार्य- श्री. श्रीकांत मोरेश्वर. नार्वेकर, डॉ. गंधार मंडलिक, लोककला- श्रीकांत श्रावण गायकवाड, शास्त्रीय संगीत- आनंद अत्रे, चित्रकला- श्री. समीर शरदचंद्र कुलकर्णी, क्रीडा- कैलास पांडुरंग लवांड (के.टी.एच एम), उच्च माध्यमिक- सौ. छाया अरुण लोखंडे (बी.वाय. के. कॉलेज), महाविद्यालयीन- प्रा. सोमनाथ तुकाराम घुले (के.एस.के., सिडको), प्रा. घनश्याम बाळकृष्ण जाधव (फार्मसी कॉलेज, गंगापूर रोड), प्रा. संध्या मिलिंद खेडेकर (एस एम आर के कॉलेज). यावेळी समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. आभार सुरेश गायधनी यांनी मानले.

# देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव सातनवरी

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खेड्यांकडे परत चला... असा संदेश देत ग्रामीण भारताचे देश विकासात महत्व अधोरेखित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही गाव करी ते राव न करी, असे उद्बोधन करुन आदर्श ग्रामीण भारताची संकल्पना ग्रामगीता या ग्रंथातून मांडली. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व व पुढाकाराने हा ग्रामीण भारत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मार्ट व इंटेलिजंट होण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे पडले आहे. नागपूर ग्रामीणमधील सातनवरी गावात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रायोगिक तत्वावर नुकतेच देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ केला. स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, मत्स्यव्यवसाय, सिंचन, आरोग्य, शिक्षण, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी आदी १८ सेवा आधुनिक तंत्रज्ञानाच्या व मुख्यत्वे भारतीय कंपन्यांद्वारे पुरविल्या जात असल्याने हे एक आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव करण्यासाठीचे उत्तम उदाहरण ठरले आहे.

------------

महाराष्ट्राने भारत देशाला स्वातंत्र्य करण्यात व येथील सामाजिक उत्थानासाठी मोलाचे योगदान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताला रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार, महिलांना आरक्षण असे क्रांतीकारी पाऊल उचलत पुढे देशभर त्याची अंमलबजावणी झाली आहे.

महाराष्ट्राने देशाला दिलेल्या या महत्वाच्या योगदानात आता स्मार्ट व इंटेलिजंट गावाची भर पडणार आहे. देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ करतांनाच राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील १० असे सुमारे ३ हजार ५०० गावे पहिल्या टप्प्यात स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा मनोदय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करत ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलवून समृद्ध गावांद्वारे भारतीय स्वातंत्र्याच्या शतक वर्षपूर्ती निमित्त संपूर्ण विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी टाकलेले हे महत्वाचे पाऊल आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशुन केलेल्या संबोधनात ग्रामीण भारत तंत्रज्ञानाद्वारे विकास पथावर अग्रेसर करण्याची घोषणा करत भारतनेट हा गावा-गावांना इंटरनेटद्वारे जोडण्याचा व पर्यायाने जगाशी ग्रामीण भारताचा संवाद घडविण्यासाठी पुढाकार घेतला.

महाराष्ट्रात भारतनेट उपक्रमांतर्गत २०१९ मध्ये पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी झाली व दुसऱ्या टप्प्यासही सुरूवात झाली. राज्याने भारतनेटच्या धर्तीवर महानेट कार्यक्रम हाती घेत अमंलबजावणीही सुरू केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने विविध महत्वाचे निर्णय घेवून राज्याला सर्व क्षेत्रात अग्रेसर बनविण्यासाठी पुढाकार घेतला असून कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराद्वारे प्रशासनाला गती व सर्व सामान्यांना उत्तम सोई-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीनेही निर्णय घेण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रालाही उत्तम सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व सामान्य माणसाला सबळ करण्यासाठी स्मार्ट व इंटेलिजंट बनविण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांनी हाती घेतला.

## स्मार्ट व इंटेलिजंट गावांकडे महाराष्ट्राची वाटचाल



### आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतातच देशवासियांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता सर्व क्षेत्रांना आवाहन करत आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली. याला प्रतिसाद देत देशात विविध क्षेत्रांमध्ये देशी बनावटीच्या वस्तू व तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे.

याच दिशेने एक पाऊल पुढे जात केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समक्ष ठेवला व त्यास तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत हा महत्वाकांक्षी प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्याचे ठरले.

त्यानुसार व्हाईस कंपनीच्या वरिष्ठ

**रितेश मो. भुयार**
**माहिती अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क, नागपूर.**

अधिकाऱ्यांनी नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची भेट घेतली. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठक होवून हा प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेली भौगोलिक व अनुषांगिक सर्व सज्जता असलेल्या नागपूर ग्रामीण मधील गटग्रामपंचायत सातनवरी या १८०० लोकवस्तीच्या गावाची निवड देशातील हा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यासाठी झाली व मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

गेल्या दोन महिन्यापासून स्थानिक प्रशासनाने आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि व्हाईस कंपनीने सातनवरी गावात मुक्काम ठोकला व या गावाला स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण करण्याच्या दिशेने काम झाले. या प्रकल्पाच्या प्रगतीचा मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी व व्हाईस कंपनीचे वरिष्ठ पदाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेतला.

### असे होत आहे सातनवरी स्मार्ट व इंटेलिजंट

सातनवरी गाव इंटरनेट सुविधांनी पूर्णपणे जोडण्यात आले आहे. वायफाय, हॉटस्पॉट आदींचा उपयोगही मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. ग्रामपंचायत ते गावातील घरे, संस्था आणि गावात वायफाय, फायबर टु द होम (फटीटीएच), सॅटेलाईट सुविधा, ४ जी, ५ जी व अन्य वायरलेस तंत्रज्ञानाचा उपयोग करून ब्रॉडबॅन्डची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

स्मार्ट शेतीला प्राधान्य देवून गावातील शेतांमध्ये सेन्सर बसविण्यात आले आहे. याद्वारे शेतीतील पेरणीपासून कापणीपर्यंत तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा, माहिती, पीक पद्धतीचे नियोजन आदी सर्व माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध झाली आहे.

या गावातील शेतकरी ड्रोन व सेन्सर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींच्या योग्य नियोजनाद्वारे पर्यावरणपूरक शेतीसह उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या दिशेने अग्रेसर झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधारत आहे.

हेल्थ कार्ड, टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होवून गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होत आहे व शहरांकडे होणारी गावकऱ्यांची पायपीट थांबत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञ डॉक्टर या उपक्रमामध्ये सहभागी होवून ग्रामस्थांना आरोग्य सुविधांचा लाभ देत आहेत. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होवून वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत आहे. शाळा व अंगणवाडीमध्ये स्मार्ट ईसीसीई व्हिडियो मार्गदर्शन पुस्तक, ए.आय. च्या माध्यमातून रिमोट क्लास रूम तसेच डिजिटल अंगणवाडी केंद्र या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

या गावात ई-स्कील सेंटर, मोबाईल हेल्थ कनेक्टिविटी आदी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संगणकामुळे ग्रामपंचायतमधील सर्व कामे जलद गतीने पूर्ण होत आहेत. तसेच ग्रामस्थांना वायफायच्या माध्यमातून गाव व शहराशी जोडणे सुलभ झाले आहे.

गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, तलावांमधील मत्स्यपालनासाठी आवश्यक असलेल्या पाण्यातील घटकांची माहिती डॅशबोर्डवर दिसत आहे. ग्रामपंचायतीने स्मार्ट पथदिवे लावले असून यामुळे विजेची बचत होत आहे. स्मार्ट कॅमेरांचा उपयोग करून गावात ठिकठिकाणी टेहळणी सुरू आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून गावातील पेयजल वितरण व गुणवत्ता नियमन करण्यात येत आहे.

स्मार्ट गर्व्हनन्स, स्मार्ट कचरा व्यवस्थापन आणि स्मार्ट अग्निशमन व्यवस्था उभारण्यात आली आहे. तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे जगात विविध क्षेत्रात क्रांती घडत आहे. भारतातही तंत्रज्ञान क्षेत्रातील स्वदेशी कंपन्यांनी एकत्र येवून समृद्ध गावाचा आदर्श निर्माण करण्याचा ध्यास धरला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकल्पास पूर्ण सहकार्य देवून देशाला दिशादर्शक ठरेल असे सातनवरी गाव स्मार्ट व इंटेलिजंट करण्यासाठी स्थानिक प्रशासन व राज्य शासनाची संपूर्ण मदत दिली. त्यातून उभे राहिलेले हे गाव आता प्रगतीच्या वाटेवर आरूढ झाले असून आधुनिक जगातील एक आदर्श गाव म्हणून सातनवरी नक्कीच आपली ओळख भारतासह जगाला करून देईल याची खात्री पटते.

# भ्रष्ट पुढाऱ्यांना फाशीच्या शिक्षेचे प्रावधान का नाही?

केंद्र सरकारकडून १३० व्या घटनादुरुस्तीसह महत्त्वाची विधेयके लोकसभेत सादर केली. यात १) भ्रष्टाचार किंवा गंभीर गुन्हेगारी आरोपांवर सलग ३० दिवसापेक्षा जास्त काळ कोठडीत असलेल्या पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना ३१ व्या दिवशी पदावरून हटविता येणार. २) निर्दोष सुटका झाल्यानंतर पंतप्रधान,मुख्यमंत्री आणि मंत्र्यांची पुन्हा त्या-त्या पदावर नियुक्ती करता येणार. ३) ज्या गुन्ह्यांसाठी त्यांना अटक केली आहे,त्यांच्या शिक्षेची तरतूद पाच वर्षे किंवा त्याहून अधिक असावी. ४) संबंधीतांना दोषी ठरवण्यात आले नाही, तरीही प्रस्तावित कायद्यामुळे त्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकता येणार.

या संपूर्ण घटनादुरुस्तीचे मनापासून स्वागत आहे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून देशातील आजी-माजी ९५ टक्के भ्रष्ट राजकीय पुढा?यांनी देशाला पोखरून टाकले आहे त्याचे काय?असा प्रश्न आजही १४० कोटी जनतेच्या मनात भेडसावत असतो. या विधेयकात आणखी एक सुधारणा करायला पाहिजे होती ती म्हणजे भ्रष्टाचारी राजकीय पुढाऱ्यांना फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चौकशी करून ताबडतोब फाशीच्या शिक्षेचे प्रावधान आवश्यक होते.

कारण देशातील किंवा राज्यातील संपूर्ण आरोपांची मुख्य जड व ही फक्त भ्रष्टाचार आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांवर जर सरकारने लगाम कसली तर अनेक आरोपींची संख्या आपोआप कमी होईल. सरकार जोपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांसाठी फाशी सारखा कठोर शिक्षेचा कायदा बनवित नाही तोपर्यंत भ्रष्ट राजकीय पुढारी सैलासी सांडासारखे मोकळे फिरतच रहातील व अनेक नवीन-नवीन गुन्हेगार निर्माण होतील. त्यामुळे भ्रष्टाचारी आरोपी हा राजकीय पुढारी असो अथवा अधिकारी यांच्यावर लगाम जर सरकारला कसायची असेल तर त्यावर फाशीची शिक्षा हाच एकमेव पर्याय आहे व उपाय आहे.

आज राज्यातच नाही तर संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व गुन्हेगारी सुरू आहे आणि याला प्रोटेक्शन देण्याचे काम राजकीय पुढारी खुलेआम करतात कारण त्यांच्या हातात सत्ता असते. त्यामुळे ते सत्तेचा दुरूपयोग करून १४० कोटी जनतेचे रक्त पितात व स्वतःची गडगंज संपत्ती जमा करून ठेवतात. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना फाशी सारखी कठोर शिक्षा झाली तरच जनतेला व शेतकऱ्यांना समाधान वाटेल.

आज कोण गरीब आणि कोण श्रीमंत याची तुलना जर केली तर आज देशातील ९५ टक्के आजी-माजी राजकीय पुढारी करोडपती आहेत.जे स्वतःला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व समाजसेवक म्हणतात यांच्या जवळ एवढा पैसा आला कोठून आणि येतो कोठून? ही बाब राज्य व केंद्र सरकारला खरोखरच माहीत नसावी का? असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.

सरकारने कायदे बनवावे परंतु ते जनहिताचे असायला पाहिजे तेव्हा त्या कायद्याला किंवा विधेयकाला खरे लोकशाहीचे प्रारूप येईल. जगात भारत कृषीप्रधान देश आहे. त्या अनुषंगाने देशातील प्रत्येक शेतकरी आजही करोडपती आहे. परंतु मात्र पैशांनी शुन्य आहे असे का? याचा विचार राज्य व केंद्र सरकार का करीत नाही?

देशाचा राजकीय पुढारी फक्त पाच वर्षे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी असतो परंतु या पाच वर्षात अचानक करोडपती होतो व मोठ्या प्रमाणात चल-अचल संपत्ती यांच्या जवळ येते हा पैसा येतो कोठून यांचाही विचार सरकारने केला पाहिजे. कारण पीढ्यानपीढ्या शेती करणारा गरीब आणि पाच वर्षे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी असणारा करोडपती ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.

सत्ताधारी पक्ष आपली सत्ता टिकुन राहावी यासाठी अनेक भ्रष्टाचारी,हत्यारे, बलात्कारांचे गुन्हे असलेल्या अनेक गुन्हेगारांना सत्ताधारी पक्ष जवळ घेतो आणि असे गुन्हेगार राजकीय पुढारी आजही सत्तेत आहेत, सोबतच मंत्री सुध्दा आहेत ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल.एक भ्रष्टाचारी व्यक्ती लाखो लोकांचे घर पोखरतो त्यामुळे बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां उद्भवतात अशा प्रकारे देशात हजारो भ्रष्ट राजकीय पुढारी आहेत की ते देशाच्या १४० कोटी जनतेला स्लोपॉयझन देण्याचे काम करतात.

आपण बलात्कारी,खुनी,आतंकवादी असे अनेक गुन्हेगार पहालेत आणि पहातो परंतु याही पेक्षा हजार पटीने देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी व अधिकारी गुन्हेगार आहेत कारण तो भ्रष्टाचार करून सात पिढ्यांची करोडोंची संपत्ती कमवीतो आणि यामुळे चलनातील पैसा आपोआप गायब होतो त्याचा फटका व प्रायश्चित्त देशातील गरीब व सर्वसामान्य १४० कोटी जनतेला भोगावा लागतो. त्यामुळेच देशात बेरोजगारी,महागाई व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां वाढल्याचे दिसून आले.

राजकीय पुढारी जेव्हा लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी बनतो तेव्हा देशाच्या प्रती, राज्याच्या प्रती आणि देशातील जनतेच्या सुख समाधानाच्या प्रती देशहिताचे कार्यकरण्याची संविधानिक शपथ घेतो. अशा लोकांनी थोडासाही गुन्हा केला तर त्याला संविधानीक पदावरून हटविलेच पाहिजे तेव्हा लोकशाही टिकून राहील.

देशात २८ राज्य व ८ केंद्र शासित प्रदेश आहेत आणि या संपूर्ण ठिकाणी ९५ टक्के राजकीय पुढारी व अधिकारी भ्रष्टाचार करून मालामाल झाले आहेत व यामुळे देश १० वर्षे मागे गेला आहे याचे प्रायश्चित्त शेतकरी, गरीब व सर्वसामान्यांना भोगावे लागत आहे आणि याचे चित्र बेरोजगारी, महागाई व शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या स्वरूपात आपण पहातो आहे.

त्यामुळे महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय यांना विनंती करतो की देशाला पोखरणारा मोठा किडा म्हणजे भ्रष्टाचार आणि याची उत्पत्ती राजकीय वर्तुळातूनच निर्माण झाली आहे व ही बाब संपूर्ण देश चांगल्याप्रकारे जानतो त्यामुळे वरील मान्यवरांना विनंती आहे की देशाला सुजलाम सुफलाम करायचे असेल तर सर्वप्रथम भ्रष्टाचाऱ्यांच्या मुसक्या आवळने अत्यंत गरजेचे आहे. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

# आंतरवाली सराटी ते आझाद मैदान!

मराठा आरक्षणासाठी अविश्रांत झुंज देणारे लढाऊ नेते मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावर ठिय्या मांडून सरकारला आणि प्रशासनाला हादरे दिले. त्यांच्या नेतृत्वाखालील मुंबईतील आंदोलनाने मराठा समाजाच्या एकजुटीचे विराट शक्तिप्रदर्शन सर्व देशाला दिसले.

मला गोळ्या घातल्या तरी चालेल, मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय आपण मागे हटणार नाही, असा निर्धार त्यांनी पहिल्याच दिवशी व्यक्त केल्यामुळे आंदोलनात सहभागी झालेल्या व राज्यातून विशेषतः मराठवाड्यातील गावागावातून मुंबईला आलेल्या हजारो तरूणांना उर्जा प्राप्त झाली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना पावणे दोन वर्षापूर्वी मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय सरकारने घेतला होता व मुंबईच्या वेशीवर जाऊन त्या निर्णयाचा जीआर मनोज जरांगे यांच्या हाती सोपवला होता, तेव्हा आरक्षणाची लढाई जिंकल्याच्या थाटात आंदोलकांनी जल्लोश केला होता. मग मनोज जरांगे यांना आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा मुंबईला का यावे लागले? मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यात यावे ही जरांगेपाटील यांची प्रमुख मागणी आहे. सगे सोयरे मसुदा अंमलात आणावा, यासाठी त्यांचा आग्रह आहे.

मुंबई– महाराष्ट्रात सर्वत्र गणोशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो आहे. याच काळात मुंबईवर मराठा शक्तिचे वादळ धडकल्याने पोलीस– प्रशासनाला मोठ्या कसोटीला सामोरे जावे लागत आहे.

२९ ऑगस्टला मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आपण मुंबईत येणार व आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू करणार असे तीन महिने अगोदर जरांगेपाटील यांनी जाहीर केले होते. चलो मुंबई आंदोलनाचे फलक मराठवाड्यात गावोगावी लागले होते. मुंबईच्या आंदोलनाची तयारी एकदिड महिन्यापासून चालू होती. याची माहिती पोलीस किंवा प्रशासनाला नव्हती असे कसे म्हणता येईल? या काळात सरकारमधील

उच्चपदस्थांनी जरांगेपाटलांशी थेट संवाद साधला असेही फारसे घडले नाही. आंदोलक लाखोंच्या संख्येने आल्यानंतर मुंबईची सर्वत्र कोंडी होणे स्वाभाविकच आहे. हजारो मोटारी, बसेस, टेम्पो वाहने मुंबईत आली आणि शेकडो वाहने मुंबईच्या वेशीबाहेरच रोखली गेली. मुंबई पोलिसांनी केवळ पाच हजार आंदोलकांसाठी परवानगी दिली होती. शिवाय मुंबईत शांतता सुव्यस्थेला तडा जाऊ नये म्हणून चाळीस अटी आंदोलकांना घातल्या होत्या.

सन २०१६ मध्ये मराठा क्रांती मोर्चाने सात - आठ लाखांचा सहभाग असणारे ५८ मूक मोर्चे काढून महाराष्ट्रात वादळ निर्माण केले होते, याची आठवण तरी प्रशासनाने ठेवायला हवी होती. २९ ऑगस्ट २०२३ रोजी जालना जिल्हयातील अंबड तालुक्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलकांवर झालेल्या पोलीस लाठीमारानंतर संताप व तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती, याचे भान ठेवायला हवे होते.

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

पण उपोषणाला सुरूवातीला एक दिवसाची परवानगी आणि पाच हजार आंदोलकांची मयार्दा अशा अटी घालणे हास्यास्पद ठरले. आंदोलन काळात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच दक्षिण मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर आंदोलकांनी ठिय्या मांडला होता. अनेक रस्ते आंदोलकांच्या वाहनांनी अडवलेले दिसले. अगदी जेजे उड्डाण पुलावरही रस्ता रोकोचा मोठा फटका बसला.

आंदोलन काळात मुंबईत वाहतुकीचे तीन तेरा वाजले. रेल्वे स्टेशन्स, पदपथ, रस्त्यावर लोकांनी ठिय्या मांडला. स्वयंपाक शिवजवण्यापासून ते जेवणखाण, मुक्काम, अंघोळीही रस्त्यावर उरकल्या. एवढ्या मोठ्या संख्येने आंदोलक आल्यावर दुसरे काय होणार, याचा अंदाज पोलीस प्रशासनाला आला नाही का?

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री झाल्यापासून मराठा समाजासाठी किती कल्याणकारी निर्णय घेतले हे सांगण्याचा सरकारने अटोकाट प्रयत्न केला. स्वतः मुख्यमंत्र्यांनीही आपल्या सरकारने मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिले, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून एक लाखावर तरूणांना रोजगार दिला, चार लाख विद्यार्थ्यांना शैक्षणिक निधी पुरवला, शिष्यवृत्ती, वसतीगृह, फी सवलत, सारथी साठी १०२५ कोटी दिले, अशा केलेल्या कामांची यादी सांगितली. पण मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून घोषीत करावे व त्यांना तसे प्रमाणपत्र द्यावे या मागणीभोवतीच जरांगेपाटील यांचे आंदोलन केंद्रीत झाले.

मराठा आंदोलक मुंबईकडे निघाले त्या दिवशी मुंबईच्या वेशीवर व अनेक ठिकाणी भाजपाने लावलेले फलक झळकत होते, इतिहास शिव्यांना नाही तर कर्तृत्वाला लक्षात ठेवतो, मराठा समाजाला पहिल्यांदा आरक्षण देणारे व न्यायालयात ते टिकवणारे देवेंद्र फडणवीसच आहेत, अशा घोषणा त्या फलकांवर होत्या. त्या फलकांवर प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, निरंजन डावखरे व नरेंद्र पाटील अशा नेत्यांची नावे होती.

जरांगेपाटील यांच्या आंदोलनाला ओबीसी नेते लक्ष्मण हाके व बबनराव तायवाडे यांनी उघडपणे विरोध केला. जरांगेपाटील यांचे आंदोलन हा राजकीय अजेंडा आहे, सरकार उलथवण्यासाठी विरोधी पक्षांच्या ते बरोबर आहेत, त्यांच्या चेहऱ्या आडून सरकार बदलण्याचा हा प्रयत्न आहे. जरांगेपाटील यांच्या मागण्या मान्य झाल्या तर ओबीसींचे आरक्षण संपून जाईल अशी भिती या नेत्यांनी व्यक्त केली.

आंदोलन काळात जरांगेपाटील यांनी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे कौतुक केले पण मुख्यमंत्र्यांवर सातत्याने कडवट भाषेत टीका केली याचे मोठे आश्चर्य वाटते. ते म्हणतात- एकनाथ शिंदे हा माणूस खरा आहे. साथ देतो. जनतेच्या वेदना समजावून घेतो. सत्तेपेक्षा गोरगरीबांच्या दुःखाला महत्व देणारा माणूस आहे. तर जनतेचे म्हणणे ऐकून त्यांची कामे तडकाफडकी करणारे अजितदादा पवार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षण, जरांगेपाटील यांचे उपोषण, आंदोलनामुळे मुंबईत झालेली वाहतूक कोंडी व मुंबईकरांचे झालेले हाल याविषयी बोलताना अतिशय संयम दाखवला. आंदोलकांविषयी त्यांनी सहानभूती दाखवली पण कोणी राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला तर तोंड भाजेल असा इशाराही दिला.

जर तामिळनाडूत ७२ टक्के आरक्षण देता येऊ शकते मग महाराष्ट्रात का न्याय देऊ शकत नाही ? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा व माजी केंद्रीयमंत्री शरद पवार यांनी विचारला आहे. घटना दुरूस्ती करून महाराष्ट्रातील मराठा समाजाला न्याय देता येईल असे त्यांनी म्हटले आहे.

सर्व राजकीय पक्ष, सर्व राजकीय नेते मराठा समाजाला आरक्षण देणार असे एकमुखाने वारंवार सांगतात. आम्हाला सत्ता द्या, सात दिवसात मराठा समाजाला आरक्षण देतो असे सांगणारे सत्तेवर आले पण त्यांना शब्द पाळता आला नाही.

विधिमंडळात एकमताने ठराव झालाय . राज्यात व केंद्रात आता डबल इंजिन सरकार आहे. सर्व पक्षातील मराठा आमदार जरांगेपाटील यांना समर्थन देतात असे चित्र दिसते. मग नेमका अडसर काय आहे? मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीतून आरक्षण देता येईल का? सगे सोयऱ्यांनाही त्याचा लाभ देता येईल का? मराठा आरक्षणाला विरोध म्हणून ओबीसींनी मुंबईत येऊन रस्त्यावर मोठे शक्तिप्रदर्शन केले तर काय परिणाम होतील? मोफत धान्य, लाडकी बहिण योजना, वसतीगृहे किंवा शिष्यवृत्या देऊनही समाधान होत नाही.

साडेचार दशकानंतरही मराठा आरक्षणावर समाधानकारक तोडगा निघू शकलेला नाही. आंदोलन चालूच राहिले तर देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे जनजीवन सुरळीत ठेवणे हे पोलीस प्रशासनापुढे मोठे आव्हान आहे.

## श्री गणेशाचा अपमान थांबवा

**वाचक लिहितात**

राज्य सरकारने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. याचे कारण म्हणजे श्री गणेश हे सर्वांचे आराध्य दैवत आहे. तसेच तो विघ्नहर्ता देखील आहे. गुरुवारी दीड दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन झाले. मुंबई महानगरपालिकेने गणेश मूर्ती समुद्रात विसर्जन करायला अटकाव केल्यामुळे या मूर्ती महापालिका विसर्जन करणार आहे असे भाविकांना सांगून मूर्ती भाविकांनी महापालिकेकडे सुपूर्त कराव्या असे फर्मान काढण्यात आले. भाविकांकडून ताब्यात घेतलेल्या ठाणे जिल्ह्यातील डायघर येथील कचरा प्रकल्पाजवळ ठेवल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार समजल्यामुळे ग्रामस्थांनी दीडशेहून अधिक मूर्ती ठेवलेले डंपर माघारी नेण्यास पालिकेला भाग पाडले. या घटनेचा व्हिडिओ सामाजिक प्रसार माध्यमांवरून प्रसारित झाल्यामुळे गणेश भक्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गणेशोत्सव हा हिंदूंचा श्रद्धेचा विषय आहे. या प्रसंगामुळे भक्तांच्या श्रद्धेवर घाला घालण्यात आला आहे. गणेशाचा झालेला हा घोर अपमान आणि विटंबना गणेशभक्त कदापि सहन करू शकत नाहीत. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

■ **शंकर पवार, सातारा.**

## या पेयांचा आहारात समावेश केल्यास कर्करोगापासून मिळेल सुटका



आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे तुम्ही आरोग्याकडे लक्ष देत नाही आणि त्यामुळे गंभीर आजार होऊ शकतात. तुमचं आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष द्यावे लागते.

कर्करोग हा एक असा आजार आहे ज्याची लागण होण्याची भीती सर्वांनाच असते. कारण अनेकदा लोक म्हणतात की कर्करोग झाल्यानंतर एखाद्या व्यक्तीला जगणे कठीण होते. तथापि, हे पूर्णपणे खरे नाही, जर तुम्ही वेळेवर उपाययोजना केल्या आणि उपचार सुरू केले तर कर्करोगाला हरवणे शक्य होते.

असे अनेक अन्नपदार्थ आणि पेये आहेत जी एकूण आरोग्याला आधार देतात तसेच कर्करोग रोखण्यास मदत करतात. हार्वर्ड-प्रशिक्षित गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ सेठी यांनी त्यांच्या एका पोस्टमध्ये अशा ३ पेयांबद्दल माहिती दिली आहे, जे कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात.

कर्करोग तेव्हा होतो जेव्हा असामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढतात आणि तुमच्या शरीराच्या इतर भागात पसरतात. तो जवळजवळ कुठेही सुरू होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते , कर्करोग हे जगभरात मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. कर्करोगाचे १०० हून अधिक प्रकार आहेत, ज्यामध्ये स्तन, फुफ्फुस, कोलन आणि मलाशय आणि प्रोस्टेट कर्करोग सर्वात सामान्य आहे. जगभरात कर्करोगाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत,

कर्करोग रोखण्यासाठी तुम्ही तुमच्या दैनंदिन आहारात काही पेये देखील समाविष्ट करू शकता. डॉ. सेठी यांनी तीन विज्ञान-समर्थित पेयांबद्दल सांगितले आहे जे कर्करोगाचा धोका कमी करण्यात भूमिका बजावतात. अशा परिस्थितीत, मर्यादित प्रमाणात त्यांचे नियमित सेवन तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

**ग्रीन टी** : ग्रीन टी हे जगातील सर्वात जास्त आवडणाऱ्या पेयांपैकी एक आहे. हा चहा तुम्हाला अनेक प्रकारच्या कर्करोगापासून देखील वाचवू शकते. ग्रीन टीमध्ये कॅटेचिन सारख्या शक्तिशाली अँटी ऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे कर्करोगापासून बचाव करण्यास प्रभावी असतात. याशिवाय, तुम्ही माचा देखील पिऊ शकता, हा ग्रीन टीचा एक केंद्रित प्रकार आहे.

**गोल्डन मिल्क** : हळदीचे लाटे, ज्याला गोल्डन मिल्क असेही म्हणतात, हे एक पारंपारिक पेय आहे जे दुधात हळद, आले, दालचिनी आणि इतर मसाले मिसळून बनवले जाते. ते कर्करोग रोखण्यासाठी सर्वोत्तम पेयांपैकी एक आहे . खरं तर, हळदीमध्ये कर्क्यूमिन असते, जे जळजळ रोखते आणि कर्करोगविरोधी गुणधर्म असतात. सौरभ सेठी म्हणाले की ते शोषण वाढविण्यासाठी बदामाचे दूध आणि चिमूटभर काळी मिरी घालून ते बनवतात.

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
(९४२१३९४३३९)



### स्वदेशीचा मंत्र

**परावलंबित्व हे**
**घातक ठरते भाऊ**
**कारण**
**दुसऱ्यांच्या ओंजळीने**
**पाणी पिता पिता**
**येते नाकी नऊ..!**

**स्वदेशी वस्तूंचा करा वापर**
**देशाची वाढेल पॉवर**
**गंगाजळीत पडेल भर**
**देश होईल आत्मनिर्भर ..!**

**क्वालिटी, क्वाटिंटी, प्राईजचे**
**उत्पादकांनो साधा युक्त मेळ**
**तेंव्हा विदेशी वस्तू वापराचा**
**खरचं लुप्त होतील खेळ..!**

## चिमुकलीवरील अत्याचार प्रकरण फास्टट्रॅकवर चालवा, आरोपी हैवानाला फाशी द्या



**परळी वैजनाथ, दि. १ : प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग क्षेत्र असलेल्या पवित्र परळी वैजनाथाच्या भूमीत बाहेर गावाहून आलेल्या मजूर कुटुंबातील एका पाचवर्षीय चिमुकलीवर हैवानी गैरकृत्य करणाऱ्या आरोपी हैवानाला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे. यासाठी हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवा, तातडीने या हैवानी वृत्तीचा बिमोड करा या मागणीसाठी तमाम परळीकरांच्या वतीने 3 सप्टेंबर रोजी परळी बंदचे आवाहन करण्यात आले आहे. परळी रेल्वे स्थानकात दि. 31 रोजी पंढरपूर येथून रेल्वेने आलेल्या व रेल्वे स्थानकावर थांबलेल्या एका मजूर कुटुंबातील चिमुकलीला उचलून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले. या प्रकरणाने सर्व स्तरात प्रचंड चीड व संताप व्यक्त केला जात आहे. अशा प्रकारचे हैवानी कृत्य करण्याची वृत्ती परळीत निपजत असेल तर याचा वेळीच बिमोड केला गेला पाहिजे. यासाठी तमाम परळीकरांनी एकत्रित येत या आरोपीला फाशीची शिक्षा मिळाली पाहिजे यासाठी आता रस्त्यावर उतरण्याचा निर्णय केला आहे. या कृत्यातील आरोपीला पोलिसांनी अटक केली असून हे प्रकरण फास्टट्रॅकवर चालवावे व या हैवानाला फाशीची शिक्षा द्यावी या मागणीसाठी जनआंदोलन करण्याबाबत नुकतीच एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते दि. 3 सप्टेंबर रोजी परळी बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

हा बंद पाळून तमाम परळीकर या नीच व हैवानी घटनेचा व अशा हैवानी वृत्तीचा निषेध व्यक्त करणार आहेत. त्याचबरोबर आपल्या प्रमुख दोन मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देणार आहेत. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेचा निषेध व आरोपीला फाशी देऊन समाजात अशा हैवानी वृत्तींना सज्जड संदेश देण्यासाठी परळी बंद आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन तमाम परळीकर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य -जिल्हाधिकारी किशन जावळे

**रायगड, दि. १ : प्रतिनिधी**

आपल्याला कर्मयोगी व्हायचे असल्यास सतत शिकत राहणे आवश्यक आहे. कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य आहे. शासकीय कामकाजातील नोटिंग, टिप्पणी, फायलिंग यांसारख्या मूलभूत बाबी प्रत्येक कर्मचाऱ्याने आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सेवाविषयक बाबींच्या पुर्तता मेळाव्याचे आयोजन जिल्हा नियोजन भवन येथे करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.



यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, नगर पालिका प्रशासन अधिकारी विराज लबडे, सह-जिल्हा निबंधक श्रीकांत सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जावळे म्हणाले की, अनुकंपा भरतीसंदर्भात शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत जुने ४५ जीआर रद्द करून नवे धोरण लागू केले असून, त्या धोरणानुसार जिल्ह्यातील ग्रामविकास, नगरविकास, पोलीस तसेच इतर सर्व शासकीय विभागांतील प्रलंबित उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त उमेदवारांनी जनसेवेची ही संधी मनापासून आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्षमतेने पार पाडावी. तसेच काही कर्मचाऱ्यांना कालबाह्यबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आला असून, सर्व विभागांनी हा लाभ जानेवारी महिन्यात देण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील १ हजार ३९० कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके डिजिटायझेशन झाली असून त्यांना सेवार्थ क्रमांक जोडण्याची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले.

कोतवाल आणि पोलीस पाटील या संवर्गातील प्रलंबित भरती प्रक्रियेत अडचणी दूर होऊन आता नियुक्ती सुलभ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. सर्व विभागांनी वर्षातून किमान दोन वेळा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या विषयांचे प्रशिक्षण द्यावे, असे निर्देश दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले.


कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने पात्र लाभार्थींना अनुकंपा नियुक्ती, पदोन्नती शिपाई संवर्ग, आश्वासित प्रगती लाभ योजना (पहिला, दुसरा, तिसरा )नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले.

# 145 कोटींची लोकसंख्या मोजण्यासाठी खर्च 14,618.95 कोटी

**नवी दिल्ली, दि. १ : प्रतिनिधी**

बऱ्याच काळानंतर देशाची अधिकृत लोकसंख्या किती हे मोजले जाणार आहे. ही जनगणना २०२७ मध्ये केली जाणार असून यासाठी भारताच्या रजिस्ट्रार जनरल (RGI) यांनी केंद्र सरकारकडे भरमसाठ निधीचा मागणी केली आहे. २०२७ च्या जनगणनेसाठी १४,६१८.९५ कोटी रुपयांच्या बजेटची मागणी करण्यात आली आहे.

ही जनगणना देशातील पहिली डिजिटल जनगणना असणार आहे. यात जातीविषयी देखील माहिती असेल. खर्च वित्त समिती (ईएफसी) ही अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी एक केंद्रीय संस्था आहे. ही संस्था सरकारी योजना आणि प्रकल्पांचे मुल्यांकन करते आणि तो परवडणारा आहे की नाही यावर मंजुरी देते. या ईएफसीकडे जनगणना करणाऱ्या




आरजीआयने मंजुरीसाठी एकूण खर्च कळविला आहे, असे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे.

ईएफसीकडून मंजुरी मिळाल्यानंतर आरजीआय गृह मंत्रालय आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करेल. यासर्वांची मंजुरी मिळाल्यानंतरच जनगणनेला वेग येणार आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत घरांची यादी करण्याचे काम आणि फेब्रुवारी २०२७ मध्ये लडाख, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड वगळता देशभरात सुरू होणारी लोकसंख्या गणना अशा दोन टप्प्यांत ही जनगणना केली जाणार आहे.

घरांची यादी करताना कुटुंबांच्या घरांची परिस्थिती, घरगुती सुविधा आणि मालमत्तेची माहिती गोळा केली जाणार आहे. मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे हा डेटा गोळा केला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे देशाचे नागरिक त्यांची माहिती स्वत: अपलोड करू शकणार आहेत. यासाठी काही अटी, नियम असणार आहेत. यासाठी जनगणना देखरेख आणि देखरेख प्रणाली (CMMS) ही वेबसाइट देखील विकसित केली जात आहे.

# फक्त कारच नाहीत, 175 वस्तू स्वस्त होणार, पण काही वस्तू महागणार

**नवी दिल्ली, दि. १ : प्रतिनिधी**

जीएसटी दरांमध्ये बदल केले जाणार आहेत. यामुळे अनेक वस्तूंवरील कर कमी झाल्याने त्यांच्या किंमती १०-१२ टक्क्यांनी कमी होणार आहेत. याची अनेकजण वाट पाहत आहेत. अशातच या कोणकोणत्या वस्तू असतील असा सवाल अनेकांच्या मनात आहे. यावर आता एक मोठी




अपडेट येत आहे.

३ आणि ४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या जीएसटी कौन्सिलची बैठक होणार आहे. यामध्ये जवळपास १७५ वस्तूंवर जीएसटी कमी करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. यामध्ये एसी, टीव्ही आणि सिमेंट आदी वस्तूंचाही समावेश आहे. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे दर २८% वरून १८% पर्यंत कमी होऊ शकतात. एवढेच नाही तर मोटरसायकल, स्कूटरवरील जीएसटी देखील कमी होणार आहे. सरकारने सुमारे १७५ उत्पादनांवरील जीएसटीमध्ये १०% पेक्षा जास्त कपात करण्याचा प्रस्ताव दिला आहे.

लहान हायब्रिड कार आणि बहुतेक मोटारसायकलींवरील जीएसटी २८% वरून १८% पर्यंत कमी करण्याचे प्रस्तावित आहे. या वस्तू स्वस्त होणार असल्या तरी कार्बोनेटेड पेयांवरील कर ४० टक्के ठेवण्याचा प्रस्ताव आहे. तंबाखू, पान मसाला, गुटखा आणि संभाव्य ऑनलाइन गेमिंग सारख्या लक्झरी आणि वाईट गोष्टींच्या कक्षेत येत असलेल्या वस्तू, सेवा या ४० टक्के नव्या स्लॅबमध्ये ठेवण्यात येणार आहेत.

**या कंपन्यांना प्रचंड फायदा...**

छोट्या पेट्रोल हायब्रिड कारवरील जीएसटी कमी झाला तर टोयोटा आणि मारुतीलाच याचा फायदा होणार आहे. कारण या दोनच कंपन्यांकडे हायब्रिड कार आहेत. टॅल्कम पावडर, टूथपेस्ट आणि शॅम्पूसारख्या पर्सनल केअरच्या वस्तूंवर जीएसटी १८% वरून ५% पर्यंत कमी होऊ शकतो. याचा फायदा हिंदुस्तान युनिलिव्हर आणि गोदरेज इंडस्ट्रीज सारख्या कंपन्यांना होणार आहे.

## 'जावेद अख्तर सैतान', इस्लामिक संघटनांनी विरोध केल्यानंतर कोलकातामधील सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

बॉलिवूडचे प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांच्या एका कार्यक्रमाला पश्चिम बंगालमधील इस्लामिक संघटनांनी विरोध केल्यामुळे हा कार्यक्रम आता पुढे ढकलण्यात आला आहे. ममता सरकार इस्लामवाद्यांसमोर झुकल्याचा आरोप आता विरोधकांनी केला आहे. राज्य सरकारद्वारे संचलित पश्चिम बंगाल उर्दू अकादमीतर्फे 'हिंदी सिनेमातील उर्दू' हा कार्यक्रम ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर दरम्यान कोलकातामध्ये होणार होता. मात्र मुस्लीम संघटना 'जमियत उलेमा-ए-हिंद'ने आक्षेप घेतल्यामुळे या सांस्कृतिक कार्यक्रमाला स्थगिती देण्यात आली आहे.

पश्चिम बंगाल उर्दू अकादमीने अपरिहार्य परिस्थिती उद्भवल्याचे कारण पुढे करत ही घोषणा केली. मात्र जावेद अख्तर यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित केल्यानंतर जमियत उलेमा-ए-हिंदच्या कोलकाता युनिटने यावर आक्षेप घेतला होता, अशी माहिती समोर येत आहे. कोलकाता युनिटचे सरचिटणीस झिलूर रहमान यांनी सांगितले, "जावेद अख्तर यांनी इस्लाम, मुस्लीम आणि अल्लाहविरुद्ध खूप वाईट गोष्टी बोललेल्या आहेत. ही व्यक्ती मानवी वेषातली सैतान आहे. त्यामुळे या कार्यक्रमात जावेद अख्तर यांना बोलावू नका." झिलूर रहमान यांनी अकादमीला लिहिलेल्या पत्रात वरील उल्लेख केलेला आहे. ते पुढे म्हणाले, उर्दू जगात अनेक चांगले कवी, लेखक आणि पत्रकार आहेत. त्यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित केले जाऊ शकते. दरम्यान नाटककार आणि कार्यकर्ते दिवंगत सफदर हाश्मी यांच्या भगिनी शबनम हाश्मी यांनी जावेद अख्तर यांना पाठिंबा दर्शविला आहे. त्यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यात म्हटले की, ही तर सुरुवात आहे. मी याबद्दल आधीच इशारा दिला होता. मुस्लिमांमधील उजव्या विचारसरणीच्या संघटनांना वैध ठरविणे बंद करावे, असे पूर्वीपासूनच सांगत आले आहे. शबनम हाश्मी यांनी पुढे म्हटले की, मुस्लिमांमधील उजव्या विचारसरणीच्या संघटनांबरोबर एकाच व्यासपीठावर येण्यास नकार दिल्यानंतर दिल्लीतील नागरी समाजाने मला पद्धतशीरपणे बाजूला सारले होते. तसेच त्यांनी जावेद अख्तर यांना टॅग करत कोलकातामध्ये येण्याचे आवाहन केले. "तुम्ही येण्यास तयार असाल तर मी कोलकातामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यासाठी तयार आहे", असेही त्या म्हणाल्या.

# "राजकीय पोळी भाजणे बंद करा"

## देवेंद्र फडणवीसांची सुप्रिया सुळे यांच्यावर टीका

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरू केलं आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन सुरू असून आज आंदोलनाचा चौथा दिवस आहे. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रातील लाखो मराठा आंदोलक सहभागी झालेले आहेत.



मराठा आरक्षणाच्या मुद्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलंच राजकारण तापलं आहे.

या संदर्भात बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या २०१८ च्या एका भाषणाचा दाखलाही सुप्रिया सुळे यांनी दिला होता. दरम्यान, त्यांच्या टीकेला आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. 'सामाजिक प्रश्नांवर राजकीय पोळी भाजणं बंद करा' अशा शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

**देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

"सुप्रिया सुळे यांच्यासह सर्वांना माझी विनंती आहे की सामाजिक प्रश्नांवर राजकीय पोळी भाजणं बंद केलं पाहिजे. कारण त्यामधून आपलचं तोंड पोळतं. दुसरं एक महत्वाचं आहे की सुप्रिया सुळे यांनी स्वत:ला एक प्रश्न विचारला पाहिजे की मराठा समाजाचे प्रश्न एवढे का चिघळले? त्यावर मार्ग कोणी काढला? त्यांच्या काळात त्यावर मार्ग निघाला का? उलट त्यांचं अडीच वर्षांचं (महाविकास आघाडी) सरकार असताना त्यांनी मराठा समाजासाठी एकही निर्णय घेतला नाही. जे निर्णय झाले ते मी आणि एकनाथ शिंदे यांनी घेतले आहेत. त्यामुळे सुप्रिया सुळे यांनी राजकीय पोळी भाजणं बंद केलं पाहिजे", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.


## आज का अंदाज

मंगळवार २ सप्टेंबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| ३४६ | ११४ | ११५ | ३७० | २५७ | २४९ | १२५ | १८० |
| ४९० | २७७ | ४४९ | २८० | ७८९ | ३५७ | २६० | ३७९ |
| ५८० | ३३० | ८९० | ११० | ३५६ | ११३ | ४६८ | २७० |
| ३५ | ६५ | ७१ | ०१ | ४३ | ५३ | ८१ | ९१ |
| ३४ | ६४ | ७२ | ०२ | ४६ | ५६ | ८२ | ९२ |
| ३८ | ६८ | ७९ | ०९ | ४० | ५० | ८७ | ९७ |

**२ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५३ | ८३ |
| १९ | २९ | ५७ | ८७ |
| १६ | २६ | ५४ | ८४ |
| १०० | ६६० | ६९० | ३५० |
| २९० | ५७० | ७०० | ४४०० |
| ३८० | ४८० | ५०० | ५५८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ ९ ० १ २

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


## आयडीएफसी फर्स्ट बँकने ग्राहक आणि बिगर-ग्राहकांसाठी जीएसटी भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली

**नागपूर, १ सप्टेंबर :** आयडीएफसी फर्स्ट बँक आपल्या ग्राहक आणि बिगर-ग्राहकांसाठी जीएसटी भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देत असल्याची घोषणा करताना आनंद होत आहे. या सुविधेनुसार, यूपीआय, कार्ड्स, नेट बँकिंग आणि बँक शाखांद्वारे जीएसटी भरणा करता येईल.

या एकत्रीकरणामुळे खालील सुविधा उपलब्ध झाल्या आहेत: १. ही सुविधा बँकेच्या ग्राहक आणि बिगर-ग्राहक अशा दोघांसाठीही खुली आहे. २. ग्राहक यूपीआय, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि इंटरनेट बँकिंगद्वारे जीएसटी भरणा करू शकतात. ३. ग्राहक देशभरातील आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कोणत्याही शाखेत डीडी, चेक किंवा रोख रकमेद्वारेही भरणा करू शकतात. ४. भरणा झाल्यानंतर चलन सहजपणे डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

हे देशभरातील सर्व करदात्यांसाठी विविध डिजिटल माध्यमांच्या माध्यमातून सोयीसुविधा आणि उपलब्धता वाढवते.

आशिष सिंग, हेड रिटेल लायबिलिटीज, आयडीएफसी फर्स्ट बँक, म्हणाले, एक युनिव्हर्सल बँक म्हणून, आमच्या ग्राहकांना परिपूर्ण सेवा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आता आयडीएफसी फर्स्ट बँकेचे ग्राहक आणि बिगर-ग्राहक जीएसटी भरणा यूपीआय, क्रेडिट आणि डेबिट कार्ड्सद्वारे करू शकतील. यामुळे, कर भरणे आता अधिक सोपे, सुलभ आणि सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे. जागतिक दर्जाच्या डिजिटल बँकिंग सेवा पुरवण्याच्या आणि सर्व करदात्यांना कोणताही अडथळा नसलेला भरण्याचा अनुभव देण्याच्या आमच्या व्यापक प्रयत्नांचा हा एक भाग आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक ही जीएसटी संकलनासाठी अधिकृत असलेल्या खाजगी बँकांपैकी एक आहे. यातून, सर्वसमावेशक बँकिंग सुविधा आणि व्यापक वित्तीय सेवा पुरवण्याच्या तिच्या वचनबद्धतेची पुष्टी होते.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुमचा दिवस संमिश्र प्रतिक्रिया देणारा असेल. आज तुम्हाला नोकरीत नवीन संधी मिळतील, ज्याचा फायदा घेऊन तुम्ही पुढे जाऊ शकता. आज कोणतेही महत्त्वाचे काम तडीस जाईल.

**वृषभ :** आज तुमचे बिघडलेले काम पूर्ण होईल आणि तुम्हाला नवीन कामांमध्येही यश मिळेल. आज तुम्हाला कोर्ट केसेसमध्येही चांगली बातमी मिळू शकते. आज तुमच्या जोडीदाराचा पूर्ण पाठिंबा मिळेल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही इतरांपेक्षा वेगळे काहीतरी करण्याचा प्रयत्न कराल, ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या वडिलांचा पाठिंबा मिळेल.

**कर्क :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. आज तुम्हाला काही कामात अपेक्षित निकाल मिळतील. व्यवसाय दुसजया ठिकाणी हलवण्याचा विचार करत असाल तर एकदा त्या जागेचे निरीक्षण करा.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र प्रतिक्रियांचा असेल. आज तुमच्या व्यवसायात कोणतेही महत्त्वाचे बदल करण्यापूर्वी तुम्ही बाजाराचे विश्लेषण केले पाहिजे. आज कंपनीकडून मोठी ऑर्डर मिळेल.

**कन्या :** नोकरीत प्रमोशन तर मिळेलच पण पगारवाढही होईल. या राशीच्या सामाजिक कायाशी संबंधित व्यक्तीचा आज एका संस्थेकडून सन्मान केला जाईल. प्रकृतीकडे अधिक लक्ष पुरविणे गरजेचे आहे.

**तुळ :** आज तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत खरेदीला जाल आणि त्यांना काही भेटवस्तू देखील द्याल. व्यवसायाशी संबंधित या राशीच्या लोकांना आज दुप्पट नफा होईल. आर्थिक बाजू मजबूत राहील.

**वृश्चिक :** आज तुम्हाला नोकरीत प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे, ज्यामुळे घरात आनंदी वातावरण असेल. आज तुम्ही जे काही काम सुरू कराल ते वेळेवर पूर्ण करा. वरिष्ठ अधिकाजयाचे सहकार्य मिळेल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी नवीन लोक भेटतील, ज्यांच्याशी भेटून तुम्हाला आनंद होईल. घरातील सर्व सदस्य तुमची प्रशंसा करतील.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुम्ही तुमची जुनी कामे पुढे न्याल आणि नवीन कामे देखील वेळापत्रकबद्ध कराल. समाजाशी संबंधित काम करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. व्यवसायाच्या दृष्टिकोनातून आजचा दिवस चांगला असेल आणि तुमचे व्यावसायिक संबंध मजबूत राहतील. ऑफिसमध्ये पूर्वीपेक्षा जास्त काम मिळेल,

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुमचे व्यावसायिक व्यवहार सुरळीत सुरू राहतील आणि तुम्हाला चांगला आर्थिक फायदाही होईल. वैवाहिक नात्यात गोडवा येईल.

## शब्दकोडे क्रमांक २२०८



**आडवे शब्द :-**


१) दारिद्र्य येणे (वा.प्र.)
६) उणीव
१०) शारीरिक त्रिदोष
१२) सर्प
१३) चा मुलगा
१६) स्वत:ला
१७) नकला करणारा
१९) वर्तन
२१) विशेष
२२) नंतर
२३) वल्लरी
२४) शिजविलेले तांदूळ
२५) अत्तराचा फाया ठेवण्याचे पात्र
२६) संयमन, दाबून टाकणे
२८) तपस्या
३०) वकिलाला दिलेले अधिकारपत्र
३३) कडू चव
३५) कणीदार पीठ
३७) कापडाला लावलेली चुणीदार पट्टी
३८) टरफल
३९) बेचव, पचपचीत
४१) बाजेला विणण्याची सुती पट्टी
४३) प्रतिष्टित
४५) विपत्तीची कहाणी
४६) पुष्परस
४८) छोटासा
५०) संगीतातील एक राग
५२) दुबळा, गरीब
५३) अरण्य
५५) टिंगल
५७) मध्यस्थ, पंच
५८) हत्ती
६०) छोटा खड्डा
६१) रडणारा
६२) हिन्दुस्थान
६३) पती
६५) चिकटविणे
६७) फौजदार
६९) ताबडतोब
७०) खबदडी
७२) उणीव, तोटा, वाण
७३) अवाजवी
७४) मीठ
७५) दहावी रास
७६) गाय

**उभे शब्द :-**

१) दीड शहाणा माणूस (वा.प्र.)
२) देव
३) चक्र
४) अपस्मार रोग
५) पोपट
६) पिंगट रंगाची गाय
७) माजलेला
८) रक्षण करणारा
९) उदबत्ती
११) अंधार
१२) चौक
१४) मनाचा ओढा
१५) एका बाजूस झुकलेला
१७) पालिकेतील सदस्य
१८) पेरणी, एक गीत प्रकार
२०) हालचाल
२१) आचारी
२२) धुंद
२५) समजण्यास कठिण, दुर्बोध
२७) एक मोठे चर्मवाद्य
२९) कोलहापुरचे एक नाव
३१) खेकडा
३२) विविध
३४) पृष्ठभागावरील तुकडा
३६) कडक व चिवट
३८) लहान
४०) एकाच काळातले
४२) विहीरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
४३) मत्स्य
४४) जावळा
४७) द्रव्य
४९) पुरुष
५१) नवप्रवेशित
५४) नट्टापट्टा
५६) पेडणे गावचा रहिवासी
५९) सांभाळ
६१) सूर्याचे एक नाव
६२) वेत्रधारी
६४) दावानल
६६) केर
६७) चंद्राची कड
६८) वाद्य वाजविणारा
६९) बारीक केस
७१) उत्तीर्ण, (इं.)

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात अवैधरित्या येणारे विदेशी मद्य जप्त



**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने नाशिक येथे कारवाई करत मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणण्यात येत असलेला विदेशी मद्याचा मोठा साठा जप्त केला आहे.

३० जूनला गुप्त माहितीच्या आधारे पथकाने नाशिक जिल्ह्यातील शिंदे येथील निरंजन पेट्रोलपंपाजवळ ही कारवाई केली. तपासादरम्यान एका टेम्पो वाहनातून मध्यप्रदेश राज्य निर्मित विदेशी मद्याची एकूण २६५ बॉक्सेस आढळून आले. या वाहनासह सुमारे ५३ लाख किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मध्यप्रदेश राज्य निर्मित विदेशी मद्य २६५ बॉक्सेस, वाहनक्रमांक एचआर-३९ एफ-६२२२, एक मोबाईल फोन असे एकूण किंमत रुपये ५३ लाख ४०० रूप सांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी अनंत भरतू राम (वाहन चालक व आरोपी) याला ताब्यात घेण्यात आले असून सदर मद्य महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे आणून विक्री करण्याचा त्यांचा उद्देश असल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. सदरची कारवाई डॉ. राजेश देशमुख आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य, प्रसाद सुर्वे सह आयुक्त, उषा वर्मा विभागीय उपायुक्त राज्य उत्पादन शुल्क यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात निरीक्षक पी.एच. गोडा, निरीक्षक किरण धिंदळे, दुय्यम निरीक्षक राहुल मोडक, सहाय्यक निरीक्षक किरण गांगुर्डे, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. राज्य उत्पादन शुल्क विभागाने जनतेला आवाहन केले आहे की, अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतूक यासंदर्भातील माहिती तत्काळ विभागाला कळवावी.

## ➤ महत्त्वाचे

### स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जन्मभूमीवर आधारित देखावा

**इंदिरानगर ।** येथील अभ्यंकर कुटुंबियांनी साकारलेली घरगुती गणेश सजावट तिच्या विषय



वस्तूमुळे आणि सादरी करणामुळे विशेष दाद मिळवत आहे. ही सजावट स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांना अर्पण करण्यात आली असून, त्यांचे जन्मस्थळ भगूर येथील घराची हुबेहूब प्रतिकृती म्हणून मांडण्यात आली आहे. ही सजावट धनंजय अभ्यंकर, मंजिरी अभ्यंकर आणि त्यांचा मुलगा यांनी तब्बल दीड महिन्याच्या कालावधीत सातत्याने मेहनत घेऊन साकारली आहे. या सजावटीची खासियत म्हणजे ती पूर्णपणे पर्यावरणपूरक आहे. शाडू मातीची मूर्ती आणि सजावटीसाठी वापरलेले साधे पण कल्पक साहित्य आहे. ६ बाय ४ आकाराचे २१ पुठ्ठे, चार्ट पेपर्स/ बाउंड पेपर्स २०, अॅक्रेलिक रंग व ग्लूगनयांच्या सहाय्याने ही आकर्षक सजावट उभारली आहे.

### होरायझन अकॅडमी ‘वंदे मातरम्’ देशभक्तीपर समूहगायनमध्ये प्रथम

**नाशिक ।** मविप्र होरायझन अकॅडमी (आयसीएसई) शाळेने लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी आयोजित ‘वंदे मातरम्’ देशभक्तीपर समूहगायन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कवी संतोष वाटपाडे यांच्या शब्दरचनात्मक



`नमस्कार माझा तुला भारता` हे गीत सादर केले. स्पर्धेचे परीक्षण सुरश्री दसककर आणि पंकज मोरे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध संगीतकार, बासरीवादक मोहन उपासनी उपस्थित होते. त्यांनी विजेत्यांना पारितोषिक वितरित करून, विद्यार्थ्यांसह शिक्षकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात लोकमान्य सोसायटीचे क्षेत्रीय व्यवस्थापक संतोष बागले, विपणन अधिकारी मंदार दिक्षित, सागर बच्छाव, जनसंपर्क अधिकारी मेघा वैद्य यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रा. आनंद अत्रे, हितेश्वर पाटील, अभिजित सुरळीकर यांच्यासह मार्गदर्शन केले.

### अजिंक्य 'तारा' स्मृतिग्रंथाचा गुरुवारी प्रकाशन सोहळा

**नाशिक ।** येथील प्रा. डॉ. नीता निवृत्ती कासार यांच्या अजिंक्य ` तारा ` या स्मृतिग्रंथाचा




गुरुवारी प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत मविप्र समाज संस्थेत तसेच अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये ज्ञानदानाचे कार्य केले. दि.४ रोजी सायंकाळी ७ वाजता वैराज कलादालन, कुलकर्णी गार्डनजवळ, शरणपूर रोड येथे कमलबाई गायकर यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मविप्र सरचिटणीस अॅड.नितीन ठाकरे भूषवतील तर प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र समाज संचालक अॅड.लक्ष्मण लांडगे, को ऑप बँक एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अॅड. विलास आंधळे उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी या स्मृतीग्रंथ प्रकाशन समारंभाला उपस्थित रहावे असे आवाहन कासार पाटील परिवारातर्फे करण्यातआले आहे.

### नारीशक्ती पुरस्काराने कवयित्री सीमाराणी बागुल सन्मानित

**नाशिक ।** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय (रजि) संचलित साहित्यरंग, साहित्य मंच नासिक आयोजित साहित्य महोत्सवाचे आयोजन आजीचं पुस्तकांचं



हॉटेल, मुंबई आग्रा महामार्ग, दहावा मैल ओझर नाशिक या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजक युवा कवी शिवव्याख्याते सुशील कुमार शिंदे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्वाती सोनवणे होत्या. उद्घाटक सुहास टिपरे, तर संमेलन अध्यक्षा ज्येष्ठ कवयित्री सुनंदा पाटील प्रमुख पाहुणे माणिकराव गोडसे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नाशिक मधील सुप्रसिद्ध कवयित्री, उपक्रमशील प्राथमिक शिक्षिका श्रीमती,सीमाराणी बागुल यांना नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री जाधव यांनी केले. नारीशक्ती पुरस्कार मिळाल्याबद्दल संपूर्ण नाशिक जिल्ह्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## महिरावणी येथील जि.प. शाळेला 'समकालीन' पुस्तके भेट

### विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीला चालना देणारा स्तुत्य उपक्रम

**नाशिक ।** महिरावणी (ता. नाशिक ) येथील जिल्हा परिषद शाळेला पुणे येथील समकालीन प्रकाशनच्या माध्यमातून ४० पुस्तकांचा दर्जेदार संच भेट देण्यात आला. हा उपक्रम दिव्यांग कर्मचारी संघटनेचे विभागीय अध्यक्ष व मातोश्री गी.दे.पाटील माध्यमिक विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, तसेच त्यांच्या हातात दर्जेदार व उपयुक्त साहित्य पोहोचावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. बाळासाहेब सोनवणेसर यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरणा मिळणार असून, पुणे येथील `समकालीन प्रकाशन` यांचे या उपक्रमात अमूल्य सहकार्य लाभले. आजच्या कार्यक्रमात बाळासाहेब सोनवणेसर स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित केली. शाळेचे मुख्याध्यापक दीपक उशीर यांनी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. या वेळी महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे जिल्हा संघटक विलास येवले, योगिता नाईक, कल्पना चौधरी, अलका वाणी, शितल सूर्यवंशी, सुनील शिंदे, शुभांगी गोसावी, रवींद्र चौरे तसेच शिक्षक वृंद उपस्थित होते.



> पुणे येथील समकालीन प्रकाशन आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तीच्या पुढाकाराने नाशिक जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये वाचनीय, प्रेरणादायी आणि बौद्धिक विकास घडवणारी पुस्तके भेट स्वरूपात दिली जात आहेत. या उपक्रमामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांना नव्या ज्ञानजगाचा लाभ मिळत आहे.वाचनाचे असंख्य फायदे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात दिसून येतात. पुस्तके वाचनामुळे चिंतनशक्ती, भाषाशैली आणि आत्मविश्वास यामध्ये वाढ होते. याशिवाय विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होऊन त्यांच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला अधिक बळ मिळते. अशा पुस्तकांच्या माध्यमातून ते जीवनातील विविध पैलूंविषयी सजग व संवेदनशील बनतात.
>
> **– बाळासाहेब सोनवणे, उपशिक्षक, मातोश्री गी. दे. पाटील माध्यमिक विद्यालय, महिरावणी, ता.जि. नाशिक.**

## चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे रंगली पावन स्वर संगीत मैफल

**नाशिक ।** चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे गणेशोत्सवानिमित्त ` पावन स्वर ` या मैफलीचे आयोजन करण्यात आले. काल दि. ३० रोजी सुप्रसिद्ध गायक डॉ.पं. आशिष रानडे यांची ही मैफल सायंकाळी ६ वाजता सी.बी.एस.जवळ श्री परशुराम भवन येथे बापये सभागृहात रंगली. या मैफलीत डॉ.रानडे यांनी शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत व नाट्यगीते सादर केली. त्यांना रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली.

प्रारंभी संस्थेचे सचिव नितीन सहस्त्रबुद्धेयांनी स्वागत तर अभय खरे यांनी प्रास्ताविक केले. चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे पूर्वी दरवर्षी गणेशोत्सवात उत्तम गानमैफली होत असत. त्यामध्ये तेव्हाचे होतकरू व नंतर नावारूपाला आलेल्या गायक कलाकारांच्या झालेल्या मैफली आजही अनेकांच्या स्मरणात आहेत. त्या उपक्रमाचे यंदा नव्याने पुनरुज्जीवन होत आहे. असे त्यांनी सांगितले.



डॉ.आषिश रानडे यांनी सुरुवातीला शुद्ध केदार रागामधील विलंबित एकतालातील बडा ख्याल सोहेलरा री माई... आणि द्रुत तीनताल मधील सावन की बुंदनीया... ही बंदिश त्यांनी गायली.

त्यानंतर इंद्रायणी काठी..., तीर्थ विठ्ठल....,माझा भाव तुझे चरणी...., हे अभंग सादर केले. राधाधर मधु मिलिंद..., युवती मना..., देवाघरचे ज्ञात कुणाला..., काटा रुते..., मनहो राम रंगी रंगले..., या भवनातील गीत पुराणे..., गुंतता हृदय हे..., तेजोनिधी लोहगोल...., सोहम हर डमरू..., मुरलीधर शाम..., स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेले दिव्य स्वातंत्र रवी...ही नाट्यगीते रसिकांना विशेष भावली. सर्वात्मका सर्वेश्वरा... या भैरवीने सांगता करण्यात आली.

या मैफलीत संवादिनीवर दिव्या रानडे व तबला साथ रसिक कुलकर्णी यांनी साथसंगत केली. तालवाद्य - सिध्दार्थ निकम, तानपुरा- साक्षी भालेराव व दुर्वा पिंगळे व स्वरसाथ- अथर्व ठाकूर यांनी केली. चित्तपावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष विजय साने यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला. मैफलीला संस्थेचे विश्वस्त, कार्यकारी मंडळाचे सदस्य तसेच अनेक सभासद व ज्ञातीबांधव, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महावितरण अधिकाऱ्यांचा विजेच्या लोडमध्ये झोल

### लाडके ठेकेदार, मोठ्या व्यवसायिकांना फायदा; नागरिकाची आर्थिक लूट

**नाशिक ।** ग्राहकांना नवीन वीज जोडणी घेण्यासाठी महावितरण कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. तरीही वेळेवर वीज कनेक्शन व दर्जेदार सेवा मिळत नाही दुसरीकडे मात्र अनाअधिकृत वीज जोडणीद्वारे लाडके ठेकेदार व व्यवसायिक वीज जोडणी घेतात व त्यांच्यासाठी रोहित्र व उपकेंद्रा वरील विजेच्या मागणीत खोटी माहिती सादर केली जाते.

परिणामी ग्राहकांना कमी दाबाने वीज पुरवठाअनियमित वीज पुरवठा, वारवार वीज उपकरणे खराब होणे अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. महावितरणमध्ये संगणकीयकरण झालेले असतना महावितरण अधिकारी वर्गाकडून मोठ्या प्रमाणत विजेच्या लोडच्या आकडेवारीत फेरफार करून लाडक्या ठेकेदाराना व मोठ्या व्यवसायिकांना फायदा पोचवण्यात येतो. व्यवसायिकांच्या फायद्यासाठी महावितरण कंपनीचे करोडो रुपयांचे नुकसान त्यांच्याच कंपनीचे अधिकारी करत असतात, याची आर्थिक वसुली मात्र सामान्य नागरिकांकडून केली जाते. डीपीची क्षमता संपून ओवर लोड झालेली असताना मोठ्या व्यवसायिकांना

> पंचवटी, द्वारका, शिखरेवाडी, नाशिक ग्रामीण (RSD) यासारख्या व इतर उपविभागांचे ओडीत करण्यात यावे यामुळे सत्यता समोर येईल. लोड शिल्लक नसल्यास व्यवसायीकान कडून आवश्यक वीज यंत्रणा उभारून घ्यावी त्यासाठी सर्व खर्च व्यवसायिकांनी करावा असा नियम असताना ठेकेदार व व्यवसायिकांना फायदा मिळावा म्हणून महावितरण अधिकारी खोटे अहवाल सादर करतात या सर्व प्रकारामुळे नागरिकांना आर्थिक तान सहन करावा लागतो. सदर प्रकारात अधिकारी, तुपाशी व जनता उपाशी अशी गत झाली आहे. **– दर्शन लढा, सामाजिक कार्यकर्ते**




लाखो, करोडो रुपयांचा फायदा व्हावा म्हणून संगणकीयकरण प्रणालीत डीपी वरील क्षमता हि निम्मी किवा त्याहून कमी दाखवली जाते. हे करण्याने अधिकाऱ्यांचे वैयक्तिक स्वार्थ देखील साधले जात असल्याची चर्चा महावितरण कार्यालयांमध्ये आहे.

व्यवसायिकांना फायदा होण्यासाठी असा होतो फेरफार- १) विजेची खोटी व कमी मागणीची माहिती दाखवली जाते. २) डी.पी. वरील लोड संगणकीयकरण प्रणालीत कमी प्रमाणत दाखवला जात नाही. ३) विजेचा लोड फिडर नुसार ट्रान्स्फर केल्याची खोटी माहिती अधिकारी पुरवतात. ४) विजेचा लोड डी.पी व उप केंद्रानुसार नुसार ट्रान्स्फर केल्याची खोटी माहिती अधिकारी पुरवतात. ५) दोन फिडर मध्ये लिंक लाइन चे खोटे व कागदोपत्री काम दाखवले जातात. ६) वीज उपकेंद्रावर खोटे व कागदोपत्री काम दाखवले जातात. ७) व्यावसायिकांकडून खोट्या कागदपत्रांद्वारे विजेची मागणी कमी करून मागितली जाते. ८) व्यवसायिकांना प्रथमता करोडो रुपयांची कामे करायला सांगतात. तेच काम नंतर हजारो रुपयांमध्ये होते.

## पंचवटी कारंजा...




पंचवटी कारंजा येथे गुरुदत्त शैक्षणिक, सामाजिक, कला व क्रीडा मंडळ ट्रस्टने साकारलेला देव आणि दानव यांच्यातील समुद्रमंथनाचा चलत देखावा...

## इंदिरानगर येथे ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ मोहिमेंतर्गत तपासणी शिबिर

**इंदिरानगर ।** गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या संकल्पनेतून ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ ही विशेष मोहीम राबवली इंदिरानगर येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर मित्रमंडळ युवा मंच श्री रथचक्र सोसायटी वीर सावरकर चौक, संस्थापक तथा माजी सभागृह नेता चंद्रकांत खोडे यांच्या सहकार्याने व एचसीजी मानवता कॅन्सरच् सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. भाजपा शहराध्यक्ष सुनील केदार, सरचिटणीस सुनील देसाई, मंडल अध्यक्ष उदय जोशी, डॉ.वैभव महाले यांचा हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले.



या शिबिरात वैद्यकीय तज्ज्ञांनी 450 पेक्षा जास्त नागरिकांची तपासणी करून मोफत सल्ला दिला.तसेच चंद्रकांत खोडे यांनी विविध शासकीय आरोग्य योजना नागरिकांपर्यंत पोहचवण्याची माहिती दिली. शिबिर यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष सुनील राऊत, संकेत खोडे, अवधुत कुलकर्णी, सुनील खोडे, अरुण मुनशेट्टीवार, सुरेश खोडे, कमलाकर खोडे, गणपत खोडे, राजेंद्र खरात, रोहीत खोडे, ऋषिकेश कुंदे, आदित्य झोले, वेदांत ठाकुर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नाशिक गणेश दर्शन...







सोनपावलांनी आगमन झालेल्या गौरी गणपतीचे अर्थात महालक्ष्मीचे घरोघरी षोडशोपचारे पूजन झाले. सिडकोतील रायगड चौकात भावसार परिवाराकडे महालक्ष्मीची स्थापना झाली. स्वाती भावसार, पूजा भावसार ऋतुजा भावसार, क्षितिजा भावसार.

# मस्त मेयोनीज सँडविच

झटपट रेसिपी

संध्याकाळी खाण्यासाठी मस्तपैकी व्हेज मेयोनीज सँडविच तयार करता येईल. झटपट होणारं हे सँडविच तुम्हाला नक्कीच आवडेल.

**सामग्री:** आठ ब्रेड स्लाईस, चार ते पाच चमचे मेयोनीज, बारीक चिरलेले दोन कांदे, बारीक चिरलेली सिमला मिरची अर्धा कप, किसलेलं गाजर पाव कप, अर्धा टी स्पून मिरपूड, चार टी स्पून हिरवी चटणी, चमचाभर लाल तिखट, दोन टी स्पून बटर, चवीनुसार मीठ.

**कृती:** एका भांड्यात सर्व भाज्या घाला. त्यात मेयोनीज, मीठ, लाल तिखट, मिरपूड घालून नीट मिसळून घ्या.



आता दोन ब्रेड स्लाईस घ्या. ब्रेडच्या या दोन्ही स्लाईसवर हिरवी चटणी लावून घ्या. एका स्लाईसवर भाज्यांचं मिश्रण पसरा. त्यावर दुसरा ब्रेड ठेवा. तव्यावर थोडं बटर घाला. आता हे सँडविच तव्यावर ठेवा. दोन्ही ब्रेड नीट भाजून घ्या. एका प्लेटमध्ये काढा. या सँडविचचे दोन त्रिकोणी तुकडे करा. चटणी आणि सॉससोबत खा.




# ज्यूटपासून फॅन्सी वस्तूंची निर्मिती

अचिव्हर




जयपूरच्या बाजारपेठेत हस्तनिर्मित उत्पादनांना खूप मागणी आहे. त्यामुळे जयपूरमधील शेकडो तरुणांनी हस्तनिर्मित उत्पादनांच्या स्वरूपात वेगवेगळे स्टार्टअप सुरू केले आहेत आणि आता त्यांच्या खास उत्पादनांची मागणी परदेशात पोहोचली आहे. मनीष शर्मा यांनीही दीड वर्षांपूर्वी घरी जूटपासून एक उत्पादन बनवले होते. त्याचे लोकांनी एका प्रदर्शनात कौतुक केले होते. त्यानंतर त्यांनी ते स्टार्टअप म्हणून सुरु करण्याचा विचार केला.

कोलकाता येथून जूटचा कच्चा माल मागवून फॅन्सी उत्पादने बनवण्यास सुरुवात केली. प्रदर्शनांमध्ये लोकांना हे उत्पादन आवडले. अशा प्रकारे त्यांच्या जूट स्टार्टअपची सुरुवात झाली. मनीष जूटपासून ५० हून अधिक हस्तनिर्मित फॅन्सी उत्पादने तयार करतात. जूटचा वापर सामान्यतः पोती, कपडे, कार्पेट आणि दोरी बनवण्यासाठी केला जातो.

मनीष म्हणतात, की आज त्यांच्या जूट उत्पादनांना बाजारात मोठी मागणी आहे आणि त्यांनी ऑनलाइन वेबसाइटद्वारे त्यांचे स्टार्टअप पुढे नेले आहे. प्रचंड मागणी असल्याने आता हे काम सहाय्यक गट आणि लघु उद्योगांच्या महिला मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे शेकडो महिलांना रोजगार मिळाला आहे. मनीष ५० हून अधिक फॅन्सी वस्तू तयार करतात. त्यात पेन स्टँड, वॉश, फ्लॉवर पॉट्स, वॉल हँगिंग, टेबल आणि खुर्चीच्या मॅट्स, डी-कोस्टर आणि बॅग्ज यासारख्या सजावटीच्या उत्पादनांचा समावेश आहे.

तागाचे कापड हे तागाच्या वनस्पतीपासून बनवलेले फायबर आहे. तागाच्या काही वेगवेगळ्या वनस्पती, प्रजाती आहेत; परंतु कॉर्कोरस ऑलिटोरियसचा वापर प्रामुख्याने कापड बनवण्यासाठी केला जातो. तथापि, तागाची कॉर्कोरस कॅप्सुलरिस ही आणखी एक प्रजाती चांगली मानली जाते. त्याची लागवड कठीण असते. तागाची झाडे दहा फुटांपेक्षा जास्त उंच वाढतात आणि त्यापासून मिळणारे तंतू लांब दोरीमध्ये गोळा केले जातात. म्हणूनच तागाचे तंतू जगातील सर्वात लांब नैसर्गिक कापड तंतूंपैकी एक आहेत. ताग पाणी सहज शोषून घेतो आणि लवकर सुकतो. ही त्याची खासियत आहे.

# भविष्यात मागणी असलेल्या नोकऱ्या



एआय आणि मशीन लर्निंग तज्ज्ञ: शिकू शकतील आणि जुळवून घेऊ शकतील अशा बुद्धिमान प्रणाली तयार करणे. या भूमिकांमध्ये अल्गोरिदम आणि मॉडेल्स विकसित करणे समाविष्ट आहे. ते मशीनस स्वायत्तपणे कार्य करण्यास सक्षम करतात.

✲ **शाश्वतता तज्ञ:** संस्थांना अधिक पर्यावरणपूरक बनण्यास मदत करणे. हे व्यावसायिक पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित तंत्रज्ञानाशी संबंधित प्रकल्पांवर काम करतात.

✲ **डिजिटल मार्केटिंग व्यावसायिक:** ब्रँडचा प्रचार करण्यासाठी सतत बदलणाऱ्या डिजिटल लँडस्केपमध्ये नेव्हिगेट करणे. ते प्रभावी मार्केटिंग धोरणे तयार करण्यासाठी डेटा ॲनालिटिक्स आणि डिजिटल टूल्स वापरतात.

नोकरी हवीय?

✲**आरोग्यसेवा कर्मचारी:** वृद्ध लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पूर्ण करणे. यामध्ये वृद्धांची काळजी, टेलिमेडिसिन आणि आरोग्यसेवा प्रशासनातील भूमिकांचा समावेश आहे.

✲ **टेक डेव्हलपर्स:** ब्लॉकचेन, व्हीआर आणि आयओटी सारख्या क्षेत्रात विशेषज्ञता असलेले. हे डेव्हलपर्स उद्योगांच्या डिजिटल परिवर्तनाला चालना देणारे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करतात.

भविष्यातील मागणी असलेल्या नोकऱ्या समजून घेतल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर नियोजन प्रक्रियेला उदयोन्मुख संधींशी जुळवून घेण्यास मदत होऊ शकते.

घ्या काळजी

## लॅपटॉप पुसण्याची आदर्श पद्धत!



लॅपटॉप स्क्रीनवर धूळ, बोटांचे ठसे आणि डाग जमा होणे सामान्य आहे. बरेच लोक हे डाग काढण्यासाठी कोणतेही कापड उचलतात आणि स्क्रीन पुसतात; परंतु असे केल्याने स्क्रीनचे मोठे नुकसान होऊ शकते. चुकीच्या साफसफाईमुळे स्क्रीनवर ओरखडे येऊ शकतात कवा डिस्प्ले खराब होऊ शकतो.

**लॅपटॉप सफाईच्या टिप्स**


*__प्रथम लॅपटॉप बंद करा आणि तो अनप्लग करा:__ स्क्रीन साफ करण्यास सुरुवात करण्यापूर्वी, लॅपटॉप पूर्णपणे बंद करा आणि चार्जर कवा कोणत्याही पॉवर सोर्समधून काढून टाका. यामुळे सुरक्षितता तर राहीलच; पण स्क्रीनवरील धूळ आणि डाग स्पष्टपणे दिसतील.

✲ **फक्त मायक्रोफायबर कापड वापरा:** टिश्यू पेपर, खडबडीत कवा साध्या कापडाने कवा पेपर टॉवेलने स्क्रीन कधीही पुसू नका. यामुळे स्क्रीनवर बारीक ओरखडे येऊ शकतात. त्याऐवजी स्क्रीन स्वच्छ करण्यासाठी बनवलेले मायक्रोफायबर कापड वापरा.

✲ **हळूवारपणे पुसा:** स्क्रीन स्वच्छ करण्यासाठी दाबणे कवा घासणे टाळा.

# बंध जुळतील का?

वेगळ्या वाटा



२८ वर्षांचा तरुण असून सहा महिन्यांनी माझं लग्न होणार आहे. माझं अरेंज मॅरेज आहे. दिवसभरात दोन ते तीन वेळा आम्ही फोनवर बोलतो. माझी होणारी बायको कधी प्रेमळ संवाद साधते तर कधी पुरती गोंधळलेली वाटते. तिला माझ्याशी बोलण्यात रस नाही, असं मला वाटतं. कुटुंबासोबत असताना ती माझ्याशी खूप गोड वागते. पण मित्रमैत्रिणींसमोर तिचं वागणं पूर्णपणे बदललेलं असतं. ती तिच्या मित्रमैत्रिणींना जास्त प्राधान्य देते. यावरून आमची बरीच भांडणंही झाली आहेत. मित्रमैत्रिणींना भेटण्यासाठी तिने आमची भेटही रद्द केली. आमचं लग्न सहा महिन्यांवर आलं आहे. पण आमचे सूर काही जुळलेले नाहीत. हे लग्न मी मोडू का? मला मार्गदर्शन करा.

**उत्तर** : मित्रा, संवादाने अनेक प्रश्न सुटतात. तू तुझ्या होणाऱ्या बायकोशी मोकळेपणाने संवाद साध. तुला खटकणाऱ्या गोष्टी तिच्यापुढे मांड. तुम्ही ठरवून लग्न करताय. त्यामुळे तुला तिचे काही गुण आवडले असतीलच. या गुणांबद्दल विचार कर. लग्न करणं सोपं आहे. पण ते टिकवून ठेवणं खूपच कठीण आहे. त्यामुळे तुमचे स्वभाव जुळायला हवेत. तुम्ही एकमेकांना समजून घ्यायला हवं. तिच्याशी बोलल्याने प्रश्न सुटले नाहीत तर समुपदेशकांची मदत घे.

# स्लीम-स्मार्ट दिसण्यासाठी...

स्टाईल स्टेटमेंट

प्रत्येकालाच आपला लूक चांगला दिसावा असे वाटते. कपड्यांचा विचार केला जातो, तेव्हा योग्य रंग आणि स्टाईल खूप महत्त्वाची असते. बरेचदा दिसून येते की काही लोग ठराविक रंगांचे कपडे घातल्याने अधिक स्लिम आणि स्मार्ट दिसतात. कपड्यांचे रंग केवळ त्वचेचा रंग वाढवत नाहीत, तर शरीराचा आकारदेखील संतुलित करतात. काही खास रंग असे आहेत, जे शरीरातील चरबी लपवण्याचा भ्रम निर्माण करतात.



**कोणत्या रंगाचे कपडे?**

✲ **नेव्ही ब्लू रंग:** नेव्ही ब्लू रंग खूप पॉलिश आणि नीटनेटका लूक देतो. तो घातल्याने शरीराचा आकार संतुलित दिसतो आणि चरबीचे भाग जास्त दिसत नाहीत. हा रंग खूप चमकदार किवा खूप कंटाळवाणा नाही, म्हणून तो ऑफिस, पार्टी किवा अगदी कॅज्युअल डे आउटगमध्येही घालता येतो.

✲ **वाईन रेड कलर:** कोणत्याही फेस्टिव्ह किवा औपचारिक कार्यक्रमाला जात असाल, तर डीप बरगंडी म्हणजेच वाईन रेड कलर घाला. हा रंग खूप रिच आणि क्लासी दिसतो. या रंगाची खास गोष्ट म्हणजे तो प्रत्येक स्किन टोनवर चांगला दिसतो आणि शरीराला स्लिम दिसण्यासदेखील मदत करतो.

✲ **डार्क पर्पल कलर:** गर्दीपेक्षा वेगळे दिसायचे असेल तर डार्क पर्पल आउटफिट ट्राय करा. हा रंग स्टायलिश लूक देतो तसेच बॉडी फॅट लपवतो.

✲ **हिरवा रंग:** गडद हिरवा रंग परिपूर्ण असेल. हा रंग केवळ स्लिम लूकच देत नाही, तर चेहराही वाढवतो.

अॅप वर्ल्ड

## व्हॉट्स अपचे स्कॅम अलर्ट फीचर

व्हॉट्स अप वापरकर्त्यांच्या सुरक्षेसाठी सतत नवीन फीचर्स जोडत आहे. या नवीन फीचरअंतर्गत एखाद्या वापरकर्त्याला एखाद्या ग्रूपमध्ये जोडणारी व्यक्ती कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये नसल्यास व्हॉट्स अप अलर्ट नोटिफिकेशन पाठवेल. या अलर्टमुळे त्या ग्रुपमध्ये किती लोक आहेत, यूजरच्या कॉन्टॅक्टमधील कोणताही सदस्य त्यात आहे की नाही आणि ग्रुप कधी सुरू झाला यासारखी महत्त्वाची माहिती मिळेल.




**चॅट न उघडता ग्रुपमधून बाहेर पडण्याचा पर्याय**

या अलर्टसोबत यूजर्सना काही सुरक्षा टिप्सदेखील दिल्या जातील; जेणेकरून ते स्कॅम टाळू शकतील. ग्रुप संशयास्पद वाटला, तर संबंधित हे चॅट न उघडता ग्रुप सोडण्याचा पर्याय निवडू शकतात. तथापि, यूजर इच्छित असेल, तर चॅट उघडून ग्रूपमध्ये सहभागी होऊ शकतो.

**हे नवीन फीचर का आवश्यक होते?**

स्कॅमर्सनी वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरील लोकांना व्हॉट्स अपवर जोडून अडकवण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः अशा ग्रुप्सचा वापर गुंतवणूक घोटाळ्यांसाठी मोठ्या प्रमाणात केला जात आहे, जिथे प्रथम लोकांना जोडले जाते नंतर त्यांना बनावट ॲप्स डाउनलोड करायला लावून पैसे उकळले जातात.

**डायरेक्ट मेसेज अलर्ट फीचर लवकरच**

व्हॉट्स अप सध्या डायरेक्ट मेसेजसाठी अशाच प्रकारच्या स्कॅम अलर्ट फीचरवर काम करत आहे, जेणेकरून वैयक्तिक चॅटमध्येही वापरकर्त्याला अज्ञात नंबरवरून धमकीचा सिग्नल मिळू शकेल. तथापि, हे फीचर अद्याप विकासाच्या टप्प्यात आहे.

मोबाईल मॅनिया

WiFi DIRECT

## इंटरनेट नसतानाही फाईल पाठवणे शक्य

आजच्या डिजिटल युगात, मोबाईलवरून मोबाईलवर फोटो, व्हिडीओ आणि कागदपत्रे शेअर करणे ही एक सामान्य गोष्ट झाली आहे; पण इंटरनेट कनेक्शन नसते, तेव्हा लोक आता फाइल्स कसे पाठवायचे याबद्दल गोंधळून जातात. इंटरनेटशिवाय फाइल्स सहज, सुरक्षित आणि जलद ट्रान्सफर करता येतात.

अँड्रॉइड कवा आयफोनमध्ये इंटरनेटशिवाय फाइल्स पाठवण्याचे उपाय

✲ **ब्लूटूथ:** यामध्ये, दोन्ही फोनचे ब्लूटूथ चालू केले जाते आणि जोडले जाते, नंतर फाइल पाठवली जाते.

✲ **वाय-फाय डायरेक्ट:** वाय-फाय डायरेक्ट तंत्रज्ञान इंटरनेटशिवायदेखील जलद फाइल पाठवण्यास अनुमती देते. दोन्ही फोनमध्ये वाय-फाय डायरेक्ट चालू करा, कनेक्ट करा आणि फाइल मॅनेजर कवा गॅलरीमधून फाइल पाठवा.

✲ **निअर शेअर:** जवळचा शेअर हा फक्त अँड्रॉइड डिव्हाइससाठी आहे. फोन सेटग्जमध्ये जाऊन ते चालू केले जाऊ शकते. एकदा सक्रिय झाल्यानंतर, फोटो, व्हिडीओ, ॲप्स आणि कागदपत्रे सहजपणे शेअर केली जाऊ शकतात.

✲ **एअरड्रॉप ॲपल:** एअरड्रॉप ही सर्वात सोपी पद्धत आहे. यामध्ये, वाय-फाय आणि ब्लूटूथ दोन्ही चालू करा, एअरड्रॉप चालू करा आणि फाइल पाठवा. आयफोनवरून आयफोनमध्ये फाइल ट्रान्सफर खूप जलद आहे.

✲ **यूएसबी ओटीजी केबल:** ओटीजी केबल असेल, तर तुम्ही एका फोनला दुसऱ्या फोनशी थेट कनेक्ट करू शकता. ही पद्धत जलद आणि मोठ्या फाइल्ससाठी योग्य आहे.

✲ **ऑफलाइन फाइल शेअरिंग ॲप्स:** प्ले स्टोअरवर असे अनेक ॲप्स उपलब्ध आहेत, जे इंटरनेटशिवाय स्थानिक हॉटस्पॉट तयार करून फाइल्स ट्रान्सफर करतात. जसे की डक-ठएळीं (जुने), दशपवशी, नरिूर इत्यादी. लक्षात ठेवा, थर्ड-पार्टी ॲप्समध्ये डेटा चोरीचा धोका असू शकतो.

# नोकरीसाठी पदवीबरोबरच कौशल्ये आवश्यक

ग्रूमिंग

आजच्या काळात, फक्त चांगली डिग्रीच नाही, तर काही विशिष्ट स्किल्स (कौशल्ये)असणे खूप महत्त्वाचे आहे. अनेक तरुण-तरुणी कॉलेजला न जाताही, त्यांच्या कौशल्याच्या जोरावर चांगली कमाई करत आहेत.

✲ **डिजिटल मार्केटिंग:** आजच्या काळात अशी कोणतीही कंपनी नाही, जी डिजिटल मार्केटग करत नाही. त्यामुळे डिजिटल मार्केटिंगची मागणी खूप जास्त आहे.

**कामाची संधी:** तुम्ही कोणत्याही कंपनीसाठी काम करू शकता कवा स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता.

**कमाई:** या क्षेत्रात सुरुवातीला वार्षिक ४ ते १० लाख रुपये मिळू शकतात. अनुभव वाढल्यावर ही कमाई आणखी वाढते.

**कसे शिकाल?:**

डिजिटल मार्केटग शिकण्यासाठी तुम्हाला अनेक ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध आहेत. तुम्ही इंटरनेटच्या मदतीने घरबसल्या हे कौशल्य शिकू शकता.




✲ **व्हिडिओ एडिटग:** आजच्या 'सोशल मीडिया' आणि युट्युबच्या युगात व्हिडीओ एडिटरची मागणी सर्वत्र आहे.

**कामाची संधी:** तुम्ही कोणत्याही संस्थेसाठी काम करू शकता कवा स्वतःचे युट्युब चॅनल सुरू करू शकता.

**कमाई:** नोकरीमध्ये सुरुवातीला वार्षिक ४ ते ७ लाख रुपये कमावता येतात.

**कसे शिकाल?:**

व्हिडिओ एडिटग शिकण्यासाठी तुम्ही ऑनलाइन कोर्सेस घेऊ शकता आणि 'व्हिडीओ एडिटग सॉफ्टवेअर'चा वापर करायला शिकू शकता.

✲ **ग्राफिक डिझायन:** आजच्या डिजिटल जगात 'ग्राफिक डिझायनर'ला मोठी मागणी आहे. कोणत्याही कंपनीला त्यांचे प्रमोशन करण्यासाठी 'ग्राफिक डिझाइनर'ची गरज लागते.

**कामाची संधी:** तुम्ही कोणत्याही कंपनीसाठी फ्रीलान्सर म्हणून काम करू शकता.

**कमाई:** सुरुवातीला वर्षाला ४ ते ७ लाख कमावता येतात.



# महाराष्ट्रातील मिनी काश्मीर

भटकंती

महाराष्ट्रात महाबळेश्वर, लोणावळा, खंडाळा, पाचगणी आणि इगतपुरी अशी अनेक हिल स्टेशन्स आहेत, जिथे निसर्गाच्या सुंदर सानिध्यात शांततेत वेळ घालवण्याची संधी मिळते. याशिवाय येथे ट्रेकगदेखील केले जाते; पण याशिवाय येथे एक असे ठिकाण आहे, ज्याचे सौंदर्य स्वर्गापेक्षा कमी नाही. म्हणूनच या ठिकाणाला महाराष्ट्राचे मिनी काश्मीर असेही म्हणतात. हे ठिकाण मुंबईपासून सुमारे २५० किलोमीटर लोणावळ्यापासून २१५ किलोमीटर आणि पुण्यापासून सुमारे १६० किलोमीटर अंतरावर आहे.

**तापोळा**

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील तापोळा हे एक सुंदर गाव आहे, जे दऱ्याखोऱ्यांनी आणि कोयना धरणाने वेढलेले आहे. या ठिकाणाला राज्याचा एक लपलेला खजिनादेखील मानले जाते. हे महाबळेश्वर शहरापासून सुमारे ३० किलोमीटर आणि पाचगणीपासून सुमारे ४५ किलोमीटर अंतरावर आहे. गर्दीपासून दूर निसर्गाच्या सानिध्यात शांततेत काही वेळ घालवू इच्छिणाऱ्यांसाठी हे ठिकाण सर्वोत्तम असेल. तापोळा तलावावर तुम्ही निसर्गाच्या सुंदर दृश्याचा आनंद घेऊ शकता.

तापोळा तलाव हे एक उत्तम ट्रेकग आणि पिकनिक स्पॉट आहे. येथे तुम्हाला बोटग, कयाकग, पॅराग्लायडग आणि पोहणे अशा अनेक साहसी ॲक्टिव्हिटी करण्याची संधी मिळू शकते. याशिवाय, तुम्ही येथील ऐतिहासिक किल्लयांना भेट देऊ शकता. जयगड आणि वासोटा किल्ले तापोळा येथील घनदाट जंगलात आहेत. ट्रेकग करून येथे पोहोचता येते. अशा परिस्थितीत जर तुम्हाला ट्रेकग आवडत असेल तर तुम्ही तुमच्या मित्रांसह येथे जाऊ शकता.

शिवसागर तलाव हा घनदाट जंगलांनी आणि सर्व बाजूंनी पर्वतांनी वेढलेला आहे. स्वच्छ निळ्या पाण्याच्या या तलावाजवळ तुम्हाला अनेक प्रजातींचे पक्षी पाहता येतील. तापोळा जवळ अनेक लहान बेटे आहेत, तुम्ही तिथे सायकल भाड्याने घेऊ शकता आणि सायकलग करू शकता. यासोबतच तुम्ही आजूबाजूच्या गावांनाही एक्सप्लोर करू शकता.

**तापोळ्याला कसे पोहोचाल?**

मुंबईहून तापोळ्याला बसने जाता येते. तुम्ही तुमच्या वाहनाने थेट महाबळेश्वरला पोहोचू शकता आणि तेथून तापोळ्याला जाऊ शकता. वाटेत तुम्हाला फलक दिसतील. तापोळ्याजवळचे रेल्वे स्टेशन वाठार आहे. तापोळा तेथून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर आहे. वाठारहून बस कवा टॅक्सीने तापोळ्याला पोहोचता येते.

# धावल्यानंतर भूक का लागते?

फिटनेस फंडा

काही किलोमीटर धावल्यानंतर अनेकांना भूक लागते. पण धावून खर्च केलेल्या कॅलरींवर खाऊन पाणी फेरता येत नाही. म्हणूनच अतिखाणं टाळण्यासाठी या भूकेची नेमकी कारणं जाणून घ्यायला हवीत. शरीराची गरज समजून घेतली की सगळं काही सोपं होऊन जाईल.

✲ धावताना बऱ्याच कॅलरी खर्च झाल्याने शरीरातली ऊर्जा कमी होते. ऊर्जेची ही गरज भागवण्यासाठी शरीराला अन्नाची गरज लागते. म्हणून आपल्याला खूप भूक लागते.



✲ डाएट करणाऱ्यांना धावल्यानंतर खूप भूक लागू शकते. डाएट करणारे आधीच कमी कॅलरी घेत असतात. त्यातच धावल्यामुळे शरीरातल्या उरल्यासुरल्या कॅलरी खर्च होतात आणि शरीर अन्नाची मागणी करतं.

✲ धावल्यानंतर अनेकांना भूक नाही तर लहान लागते. आपल्याला भूक लागली आहे का तहान, याबाबत अनेकांचा गोंधळ उडतो. या गोंधळात काही लोक खूप खातात आणि डिहायड्रेट होतात. तसंच भूक पाण्याने मारणंही चुकीचं आहे. भूक आणि तहान यातला फरक ओळखायला शिका.

✲ अनेकांना मानसिक कारणांमुळे भूक लागते. आपण खूप धावलोय. त्यामुळे आता आपल्याला खायला हवं, असे विचार मनात आल्यामुळे प्रत्यक्षात भूक लागलेली नसतानाही खावंसं वाटतं.

✲ व्यायामाच्या प्रत्येक प्रकाराचा तुमच्या भूकेवर वेगळा परिणाम झाल्याचं पहायला मिळतं. धावणं हा तीव्र स्वरुपाचा व्यायाम आहे. यामुळे प्रचंड कॅलरी खर्च होतात आणि भूक लागते. पण प्रत्येक व्यायामप्रकाराच्या बाबतीत असं म्हणता येणार नाही. काही प्रकारच्या व्यायामांनंतर भूक मरते.

# भविष्यासाठी सर्वोत्तम करिअर

करीअरवाटा

भविष्यासाठी नियोजन करताना, अशा करिअरचा विचार करणे आवश्यक आहे जे वाढतील आणि स्थिरता देतील अशी अपेक्षा आहे. भविष्यासाठी काही सर्वोत्तम करिअरमध्ये हे समाविष्ट आहे.



✲ **डेटा सायन्स आणि ॲनालिटिक्स:** मोठ्या डेटाचे महत्त्व वाढत असताना, डेटा सायंटिस्टना जास्त मागणी आहे. हे व्यावसायिक संस्थांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी जटिल डेटाचे विलेषण आणि अर्थ लावतात.

✲ **आरोग्यसेवा:** नर्सिंग, आरोग्यसेवा प्रशासन आणि टेलिमेडिसिन यासारख्या आरोग्यसेवेतील करिअरमध्ये लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. वृद्धांची लोकसंख्या आणि वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगती ही मागणी वाढवते.

✲ **कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्स:** भविष्यात 'एआय' तज्ज्ञ आणि रोबोटिक्स अभियंते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. उद्योगांमध्ये परिवर्तन घडवून आणणारे आणि कार्यक्षमता सुधारणारे तंत्रज्ञान विकसित करतील.

✲ **अक्षय ऊर्जा:** जग शाश्वत ऊर्जेकडे वळत असताना, अक्षय ऊर्जेतील करिअर अधिक महत्त्वाचे बनतील. यामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि इतर हरित तंत्रज्ञानातील भूमिकांचा समावेश आहे.

✲ **सायबर सुरक्षा:** डिजिटल धोक्यांमध्ये वाढ होत असताना, सायबर सुरक्षा व्यावसायिक आवश्यक असतील. ते सायबर हल्ल्यांपासून संस्थांचे संरक्षण करतात आणि संवेदनशील माहितीची सुरक्षा सुनिश्चित करतात.

## दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'

दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...



रघुनाथ आटपाडकर यांच्या डोंबिवली स्थित घरी बंधु सुनिल आटपाडकर सौ. विद्यालक्ष्मी आटपाडकर,लाडक्या बाप्पाचे दर्शन करताना.



श्री.जीवन भोसले, गोवर्धन बिल्डिंग,लोअर परेल ( पुर्व)



राधिका रेसिडेन्सी उमरगाव गुजरात येथील श्री.रवींद्र व सौ.सपना मुठाळ यांच्या घरातील श्री गणेशमूर्ती

खैरानीचा सम्राट आणि भाजप प्रभाग क्र. 158 यांच्या तर्फे आयोजित थायरॉईड तपासणी शिबिर , या शिबिरातून अनेक नागरिकांना मोफत तपासणी व योग्य मार्गदर्शन मिळाले.



# शेअर बाजारात जोरदार तेजी सेन्सेक्स 555, तर निफ्टी 198 अंकांनी वधारला



**मुंबई, दि. १ प्रतिनिधी**

शेअर मार्केटमध्ये सोमवार रोजी जबरदस्त तेजी पाहायला मिळाली आणि बेंचमार्क निर्देशांक सेन्सेक्स व निफ्टी अशा पातळीवर बंद झाले जिथे गुंतवणूकदार पुन्हा एकदा बाजारात खरेदी करण्याचा उत्साह दाखवू शकतील. सेन्सेक्स ५५५ अंकांच्या तेजीने ८०३६४ च्या पातळीवर बंद झाला. तर निफ्टीत १९८ अंकांची वाढ झाली आणि तोही २४६२५च्या पातळीवर बंद झाला. यामुळे गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेली घसरण थांबली. या तेजीमुळे बीएसईवरील सूचीबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलात ५ लाख कोटी रुपयांची भर पडली. बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल मागील सत्रातील ४४४ लाख कोटी रुपयांवरून वाढून सुमारे ४४९ लाख कोटी रुपये झाले.

मिड आणि स्मॉल-कॅप विभागाने बेंचमार्कपेक्षा चांगली कामगिरी केली आणि तेही तेजीने बंद झाले. बीएसई मिडकॅप निर्देशांक १.६४ टक्क्यांनी वाढला, तर स्मॉलकॅप निर्देशांक १.४९ टक्क्यांनी वाढला. शेअर बाजारातील या तेजीला ऑटो स्टॉक्सनी लीड केले आणि निफ्टी ५० निर्देशांकातील टॉप ५ गेनर्समध्ये सर्व ऑटो स्टॉक्स होते. यात बजाज ऑटो, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा मोटर्स, हिरो मोटोकॉर्प, आयशर मोटर्स, मारुती सुझुकी यांचा समावेश होता. आयटी स्टॉक्समध्येही तेजी दिसली. हिंडाल्कोच्या नेतृत्वाखाली मेटल स्टॉक्सही चमकले.

बाजारातील तेजीची काही कारणे पुढीलप्रमाणे होती –

**सेन्सेक्स 80364**

**निफ्टी 24,625**

**ऑटो सेल डेटा**

ऑगस्ट २०२५ मधील ऑटो सेलचे मजबूत आकडे पाहून ऑटो स्टॉक्समध्ये मोठ्या प्रमाणात खरेदी झाली. टीव्हीएसची विक्री ३०% ने वाढली, तर आयशर मोटर्सने एनफिल्डच्या विक्रीत ५५% वाढ नोंदवली. बजाज ऑटोने ऑगस्ट २०२५ मध्ये विक्रमी ४.१७ लाख युनिट्सची विक्री केली.

**जीडीपी ग्रोथ रेट**

भारताच्या पहिल्या तिमाहीतील जीडीपी वाढीचा दर बाजाराच्या अपेक्षेपेक्षा चांगला राहिल्याने मार्केटच्या सेंटीमेंटमध्ये सुधारणा झाली. आगामी परिषद बैठकीत जीएसटीला युक्तिसंगत करण्याची अपेक्षा बाजारासाठी एक प्रमुख सकारात्मक घटक ठरत आहे. भारताच्या पहिल्या तिमाहीतील जीडीपी वाढीचा दर अंदाजापेक्षा जास्त म्हणजे ७.८ टक्के राहिला आहे, ज्यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळातही अर्थव्यवस्थेच्या मजबुतीबद्दल गुंतवणूकदारांचा विश्वास अधिक बळकट झाला आहे.


आजच्या बाजारातील तेजीला आणखी एक बातमी कारणीभूत ठरली, ज्यात अमेरिकन न्यायालयाने टॅरिफ बेकायदेशीर ठरवले. जरी भारतावर टॅरिफ अद्याप लागूच आहे आणि त्यात काही बदल झालेला नाही, तरी गुंतवणूकदारांना या निर्णयामुळे थोडा दिलासा मिळाला. अमेरिकन न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या बहुतेक टॅरिफना बेकायदेशीर ठरवले, मात्र ते ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत लागू ठेवले.



दर्शन पाटील, वावोशी फाटा, खोपोली यांच्या निवासस्थानी सिंहासनावर विराजमान असलेला बाप्पा



श्री विजयराव महादेव मोरे महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस व श्री उत्तमराव मोरे जिल्हा अध्यक्ष राष्ट्रीय पर्यावरण एवं खनिज संरक्षण मंच यांच्या धाटाव निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराया



श्री. सुनिल रा. पाटील आणि सौ. रेखा सुनिल पाटील यांच्या विलेपार्ले पूर्व येथील निवासस्थानी प्रतिष्ठापित गणरायाची सुबक मूर्ती.



अमृतशेठ कुथे यांच्या घरी गणरायाचे आगमन दर्शन घेण्यासाठी मा सरपंच अभिजीत पाटील उपस्थित व कार्यकर्ते

## थायरॉईड ग्रंथींचे आजार आणि उपचार

**बदलत्या काळानुसार आपली जीवनशैली देखील झपाट्याने बदलतेय. अर्थातच या बदलत्या जीवनशैलीत आपला रोजचा दिनक्रम हा देखील अत्यंत व्यस्त आणि तितकाच त्रस्त होताना दिसतोय.त्यातच आहाराच्या बदललेल्या सवयी आणि चुकीचा आहार,शारीरिक श्रमाचा अभाव आणि सातत्याने ताणतणावग्रस्त वातावरण या सगळ्या कारणामुळे नवनवीन प्रकारच्या आजारांना चालना मिळताना दिसतेय. पूर्वी फार दुर्मिळ असलेले अनेक आजार हल्ली अगदी सर्वसामान्य आजारांच्या रांगेत जाऊन बसलेले दिसतात. अर्थात,झपाट्याने प्रगतीपथावर असलेले आपले वैद्यकशास्त्र देखील अशा आजारांवर उपचारांची मात्रा तितक्याच वेगाने संशोधित करण्यात यशस्वी देखील होतेय. अलीकडच्या काळात थायरॉईड ग्रंथींचे आजार याबद्दल आपण सातत्याने ऐकत असतो. हा थायरॉईड ग्रंथींचा आजार नेमका काय आहे?त्याची कारण काय आहेत आणि त्यावर उपचार काय आहेत?याच प्रश्नांची उत्तर मिळविण्यासाठी डॉकटर तिलोत्तमा पराते यांच्याशी साधलेला संवाद.**

**हॅलो डॉक्टर**

१] थायरॉईड म्हणजे नेमकं काय?

आपल्या शरीरात विविध प्रकारच्या ग्रंथी असतात. पॅनक्रियाज,ओव्हरीज,अडनिर्ल,टेस्टीज अशा प्रकारच्या या ग्रंथी असतात. थायरॉईड नावाच्या ज्या ग्रंथी आहेत त्या आपल्या श्वसननलिकेच्या वरच्या भागात आणि मानेच्या मागच्या बाजूस असतात. या ग्रंथींचा आकार हा फुलपाखरा एवढा असतो आणि वजन १० ते १५ ग्राम असत.

२]थायरॉईड ग्रंथीचे कार्य नेमके काय असते?

आपल्या शरीरातील मेंदूमध्ये पिटीट्युरी ग्रंथी असतात या ग्रंथीमधून स्टिम्युलेटेड हार्मोन्स निघतो. हा हार्मोन्स थायरॉईड ग्रंथींना स्टिम्युलेट करतो. थायरॉईड मधून पुन्हा दोन प्रकारचे हार्मोन्स निघतात. टी ३ आणि टी ४ टी ३ म्हणजेच ट्राय आयझो थायरॉईड आणि टी ४ म्हणजे टेट्रा आयझो थायरॉईड हे हार्मोन्स शरीरात ऊर्जा निर्मितीच कार्य करतात. त्यांना नियंत्रित ठेवण्याचं कार्य थायरॉईड ग्रंथी करत असतात. आपल्या शरीरातील पेशींना ऊर्जा देण्याचं काम हे हार्मोन्स करतात. थायरॉईड ग्रंथी हेच ऊर्जा देण्याचं काम सुरळीत ठेवतात.

३]थायरॉईड हा आजार नेमका कसा होतो?

आपल्या शरीरात टी ३ टी ४ आणि टीएचएस या ग्रंथीं प्रमाणात असतात. शरीरात टी ३ ग्रंथी कमी झाल्या तर त्या टीएचएस ला संदेश पाठ्वततात आणि या कमी झालेल्या हार्मोन्सची तूट भरून काढतात. या प्रमाणेच शरीरातील टीएचएस हार्मोन्स वाढले कि टी ३ आणि टी ४ हे अतिरिक्त हार्मोन्स कमी करण्यासाठी मदत करतात . परंतु या हार्मोन्सचे प्रमाण असंतुलित झाले कि थायरॉईडचे आजार होतात. या आजराचे हायपो थायरोसिस आणि हायपर थायरोसिस असे दोन प्रकार आहेत .टी ३ आणि टी ४ चे प्रमाण कमी झाले आणि टीएचसी वाढले कि हायपो थायरोसिस होतो आणि टी ३ आणि टी ४ चे प्रमाण वाढले आणि टीएचएस चे प्रमाण कमी झाले कि हायपर थायरोसिस होतो.



**लोकारोग्य**

४]थायरॉईड या आजाराची लक्षण नेमकी काय असतात?आणि त्याच निदान कस करतात?

हायपो थायरोसिस मध्ये रुग्णाचे पाय सुजतात,अंगावर सूज येते,खूप थंडी सहन होत नाही रुग्णाला भूक कमी लागते परंतु वजन मात्र वाढते हृदयाच्या वर जी पिशवी असते त्यात पाणी भरते आणि स्त्रियांच्या बाबतीत मासिक पाळीच्या काळात रक्त स्त्राव जास्त होतो. तर हायपर थायरोसिस मध्ये रुग्णाचे वजन कमी होते भूक कमी लागते. कधी कधी जुलाब होतात अशा रुग्णाला जास्त उष्णता सहन होत नाही. तळहाताला घाम सुद्धा फुटतो.

हायपो थायरोसिसचे निदान करण्याकरीता प्रोफाइल ब्लड टेस्ट करतात. या यामध्ये टी ३,टी ४आणि टीएचएसचे प्रमाण तपासले जाते जर हे प्रमाण ०. ७ ते १० पर्यंत असेल तरी उपचारांची गरज नसते मात्र त्यापेक्षा वाढलेले असेल तर उपचार करावे लागतात.

५] थायरॉईड आजारावर उपचार कोणते आहेत?

हायपो थायरॉईस आणि हायपर थायरॉईस या दोन्ही आजारात उपचार वेगवेगळे आहेत. हायपो थायरोसिस मध्ये रुग्णाला लिओ थायरॉक्सिन नावाच्या गोळ्या १२. ५ ग्राम पर्यंत देतात रुग्णाच्या टेस्ट प्रमाणे या गोळ्यांचा डोस वाढवता येतो. हायपर थायरोसिस मध्ये कार्डिनयझील गोळ्यांचा डोस १५ मिलिग्रॅम दिला जातो. थायरॉईडची लेव्हल प्रमाणात आली कि डोस ची मात्रा कमी केली जाते. हि औषध घेताना पथ्य नसत फक्त आपली मधुमेहाची,उच्चरक्तदाबाची गोळी या गोळ्या घेतल्यानंतर अर्ध्यातासाच्या अंतराने घेता येतात.

## खोकल्याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी २९ ऑगस्ट हा 'राष्ट्रीय खोकला दिन' म्हणून घोषित

कन्सल्टंट फिजिशियनच्या व्यावसायिक संघटनेपैकी असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया महाराष्ट्र स्टेट चॅप्टर यांनी, जागतिक औषध निर्माण करणारी कंपनी डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज लिमिटेड यांच्या सहकार्याने, २९ ऑगस्ट हा "राष्ट्रीय खोकला दिन" म्हणून घोषित केला. अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम असून, त्याचा उद्देश खोकल्याबाबत राष्ट्रव्यापी संवाद साधणे, रुग्ण आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांमध्ये जागरूकता वाढवणे, तसेच पुराव्यावर आधारित निदान आणि उपचारांच्या पद्धतींना प्रोत्साहन देणे हा आहे.




ही तारीख डॉ.अशोक महासूर यांच्या पुण्यतिथीची आहे, जे श्वसनविकार तज्ज्ञ आणि इंडियन चेस्ट सोसायटीचे संस्थापक होते. भारतातील फुफ्फुसांच्या रोगांच्या उपचारात (pulmonology) त्यांच्या अमूल्य योगदानाला आदरांजली वाहण्यासाठी हा दिवस निवडण्यात आला आहे. 'युरोपियन रेस्पिरेटरी जर्नल' नुसार, भारतातील जवळजवळ 30% रुग्णांनी खोकल्याला दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात सामान्य लक्षण म्हणून नोंदवले आहे. तरीही, प्रमाणित क्लिनिकल मार्गदर्शक तत्त्वांच्या अभावामुळे चुकीचे निदान आणि अयोग्य उपचार मोठ्या प्रमाणावर होतात. राष्ट्रीय खोकला दिवस सुरू करून, एपीआय एमएससीचा उद्देश आरोग्यसेवा व्यावसायिकांमध्ये पुराव्यावर आधारित उपचार पद्धतींना प्रोत्साहन देऊन आणि रुग्णांची स्थिती सुधारून ही गंभीर कमतरता दूर करण्याचा आहे.

**जनआरोग्य**

असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया MSC चे माननीय संयुक्त सचिव डॉ. अगम वोरा म्हणाले, "खूप काळापासून खोकल्याला किरकोळ आरोग्य समस्या मानले गेले आहे, ज्यावर बहुधा वैज्ञानिक पद्धतीपेक्षा लक्षणांवर आधारित उपचार केले गेले. राष्ट्रीय खोकला दिवसाच्या माध्यमातून, आम्ही भारतातील खोकल्याच्या व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी दूर करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे डॉक्टरांना पुराव्यावर आधारित मार्गदर्शक तत्त्वे मिळतील, जी त्यांना लक्षणांवरून खोकल्याचे वेगवेगळे प्रकार लवकर ओळखण्यास आणि निदान करण्यास मदत करतील. तसेच, सीडीएससीओने मंजूर केलेल्या एफडीसी द्वारे उपचार सुरू करून उत्तम क्लिनिकल परिणाम मिळवता येतील.''

## औषधी गुणधर्म असलेली केळफूल

खनिजांनी भरलेल्या केळीच्या फायद्यांविषयी आपण सगळ्यांनी बरेच काही ऐकले असेल, परंतु आज आपण केळ फुलांच्या फायद्यांबद्दल जाणून घेणार आहोत. केळीच्या फुलांमध्ये फायबर, प्रथिने, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, तांबे, फॉस्फरस आणि व्हिटामिन ईसारखी खनिजे आणि जीवनसत्वे आढळतात. हे फुल कच्चे किंवा शिजवून, तसेच सूप, कोशिंबीर आणि तळून देखील खाल्ले जाऊ शकते. याशिवाय केळीच्या फुलाचा हेअर पॅक किंवा फेस पॅक म्हणूनही वापर करता येते केळीच्या फुलामध्ये ॲसिडस्, टॅनिन, फ्लेव्होनॉइड्स आणि इतर अँटीऑक्सिडेंट असतात, जे कर्करोग आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करतात. केळीच्या फुलांचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते. ज्याद्वारे शरीरातील साखर देखील नियंत्रित केली जाते. अशाप्रकारे, हे फुल मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर आहे.केळीच्या फुलांमध्ये निराशाविरोधी अर्थात अँटी-डिप्रेशन घटक असतात, जे मानसिक तणावापासून आपले संरक्षण करतात आणि आपला मूड सुधारण्यास मदत करतात.मासिक पाळी दरम्यान जास्त वेदना होत असल्यास आणि रक्तस्त्राव जास्त झाला असेल, तर केळीचे फुल दह्या बरोबर घेतल्यास खूप आराम मिळतो केळफुलात डाएटरी फायबर्स आणि व्हिटामिन ई सोबतच ॲन्टीऑक्सिडंटसदेखील मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे शरीरातील फ्री रॅडीकल्सचा धोका कमी करण्यास मदत होते. परिणामी कॅन्सरचा धोकादेखील मंदावतो.

**आरोग्यम् धनसंपदा**



संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

## मोदी-पुतिन यांच्या भेटीच्या काही मिनीटांपूर्वी अमेरिकेला आठवली भारताबरोबरची मैत्री; परराष्ट्र मंत्र्यांनी केले सूचक विधान

**वॉशिंग्टन, दि. १ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सोमवारी चीनमधील तियानजिन येथे शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) शिखर परिषदेत सहभागी झाले. यावेळी मोदींनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी चर्चा केली. या भेटीचे फोटो आणि व्हिडीओ चांगलेचे व्हायरल होत आहेत. गेल्या काही दिवसांपासून भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध तणावाचे बनल्याने या भेटींना विशेष महत्त्व आले आहे.

एकीकडे पंतप्रधान मोदी पुतिन आणि शी यांच्याशी गळाभेट घेत आहेत तर दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनातील एका प्रमुख व्यक्तीने नवी दिल्ली आणि वॉशिंग्टन डीसी यांच्यातील संबंध हे '२१व्या शतकातील एक महत्त्वपूर्ण नातेसंबंध' असल्याचे म्हटले आहे.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध हे नवीन उंची गाठत राहातील असे म्हटले आहे. "या महिन्यात आपण, आपल्याला पुढे घेऊन जात असलेले लोक, प्रगती आणि संधींवर लक्ष केंद्रित करत आहोत. नवे उपक्रम आणि उद्योजकता यापासून संरक्षण आणि द्विपक्षीय संबंधांपर्यंत आपल्या दोन्ही बाजूंच्या नागरिकांची टिकून राहिलेली मैत्री ही आपल्या या प्रवासाला ऊर्जा देते," असे रुबियो म्हणाले आहेत. एससीओच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्र्ध्यक्ष पुतिन यांच्या भेटीच्या



अगदी काही मिनिटांपूर्वी अमेरिकेच्या दूतावासाकडून ही पोस्ट करण्यात आली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर ५० टक्के टॅरिफ लादल्यानंतर युरेशियन शक्ती भारत, चीन आणि रशिया हे एससीओ शिखर परिषदेच्या निमित्ताने एकत्र आल्या आहेत, त्या पार्श्वभूमीवर रुबियो यांनी केलेले विधान महत्त्वाचे आहे. रशियाकडून तेल खरेदी बंद करण्यास भारताने नकार दिल्यानंतर अमेरिकेने भारतीय आयातीवर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. रशियाने युक्रेनविरोधात युद्ध सुरू केल्यानंतर अमेरिका आणि युरोपियन देशांनी रिशियावर अनेक निर्बंध लादले आहेत. असे असताना देखील भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

चीनमधील तियानजिन येथे आयोजित एससीओ शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी, रशियाचे अध्यक्ष पुतिन आणि चीनचे पंतप्रधान शी यांनी एकमेकांची भेट घेतली. यावेळी या जागतिक नेत्यांमध्ये काही काळ अनौपचारिक गप्पा देखील झाल्याचे पाहायला मिळाले.

## धनखड यांचा उपराष्ट्रपतींचे अधिकृत निवासस्थान सोडण्याचा निर्णय



**नवी दिल्ली, दि.१ वृत्तसंस्था**

आरोग्याच्या कारणास्तव उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्यानंतर एका महिन्याने, जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतींचे अधिकृत निवासस्थान सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ते आज संध्याकाळी उपराष्ट्रपतींचे अधिकृत निवासस्थान रिकामे करून दक्षिण दिल्लीतील छत्तरपूर इंडियन नॅशनल लोक दल (आयएनएलडी) प्रमुख अभय सिंग चौटाला यांच्या फार्महाऊसमध्ये स्थलांतरित होणार आहेत.

२१ जुलै रोजी राजीनामा दिल्यापासून ७४ वर्षीय धनखड हे सार्वजनिकपणे समोर आलेले नाहीत. "गेल्या महिन्यापासून ते उपराष्ट्रपतींच्या अधिकृत निवासस्थानातच असून, येथे ते त्यांच्या नातेवाईक आणि जुन्या मित्रांना भेटत आहेत. आज ते डॉक्टरांना भेटण्यासाठी बाहेर पडले होते", असे एका सूत्राने सांगितले. उपराष्ट्रपतीपादाचा राजीनामा दिल्यानंतर ते पहिल्यांदाच उपराष्ट्रपतींच्या निवासस्थानातून बाहेर पडले असल्याचेही सूत्राने सांगितले.

"धडखड यानी सुरक्षा यंत्रणांना कळवले आहे की, ते संध्याकाळी ५ वाजेच्या सुमारास छत्तरपूर एन्क्लेव्ह येथील गदाईपूर डीएलएफ फार्म्समधील एका खाजगी निवासस्थानात जाणार आहेत. त्यांचे बरेच सामान आधीच हलवण्यात आले आहे, तर अनेक घरगुती वस्तू उपराष्ट्रपतींच्या अधिकृत निवासस्थानातील फ्लॅटमध्ये हलवण्यात आल्या आहेत", असे सूत्रांनी सांगितले.

चौटाला यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी धनकड त्यांच्या फार्महाऊसवर जात असल्याच्या वृत्ताला त्यांनी दुजोरा दिला. "आमचे जुने कौटुंबिक संबंध आहेत. त्यांनी मला घर मागितले नव्हते तर, मी त्यांना घर देऊ केले", असे ते म्हणाले.

## तांत्रिक समस्येमुळे पुण्याहून दिल्लीला जाणारे विमान पुन्हा पुणे विमानतळावर उतरवले

**पुणे, दि. १ प्रतिनिधी**

तांत्रिक समस्येमुळे पुण्याहून दिल्लीला जाणारे विमान पुन्हा पुणे विमानतळावर उतरवण्यात आल्याची प्राथमिक माहिति माहिती समोर येते आहे. दिल्लीला न जाता हवेतच काही वेळ उड्डाण केल्यानंतर पुन्हा हे विमान पुणे विमानतळावर उतरवण्याची पायलटने परवानगी मागितली, परवानगी मिळताच पुन्हा विमान पुणे विमानतळावर उतरवण्यात आले. प्रवाशांनी या घटनेला इमर्जन्सी लँडिंग झाल्याची सांगितले. मात्र विमानतळ प्रशासनाने कोणतीही इमर्जन्सी लँडिंग नसल्याचे सांगत मेडे कॉल आला नाही, असेही स्पष्ट केले. याबाबत पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके म्हणाले, सकाळी नेहमीप्रमाणे पुणे विमानतळाहून दिल्लीला जाण्यासाठी स्पाइस जेटच्या विमानाने उड्डाण केले. काही वेळानंतर पायलटला विमानामध्ये तांत्रिक अडचण असल्याचे जाणवले. त्यामुळे पायलटने पुन्हा विमान पुणे विमानतळावर उतरवले. कोणतीही इमर्जन्सी लँडिंग करण्यात आली नाही, किंवा एटीसीला कोणताही मेडे कॉल आला नाही. मात्र तांत्रिक कारणामुळे पायलेटने विमान पुन्हा पुणे विमानतळावर उतरवले



मुंबईतील माझगाव ताडवाडी येथी सुबोध चित्तरंजन तोडणकर यांच्या घरचा गणपती बाप्पा.

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002. Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219